**मार्गदर्शक:**

अनिल कुमार सक्सेना

विकास गुप्ता

**प्रकाशक:**

**संकलन व लेखन:**

अशोक डी.पाटील

**छायाचित्रे:**

अशोक डी.पाटील

**मांडणी:**

साई-शा कम्युनिकेशन्स

kshaileshrao@gmail.com


## मनोगत

नैसर्गिकरित्या विपूल प्रमाणांत असलेल्या औषधी वनस्पतींचा साठा आता संपुष्टात येत आहे. या वनस्पतींचा ओळख परिचय नसलेमुळे, साठयापेक्षा मागणी वाढलेने गुणवत्ता कमी झाली आहे. विश्वासार्हता ही कमी होत आहे. यातून मार्ग काढणेसाठी या वनस्पतींची मोठया प्रमाणांत लागवड जोपासना होणे अत्यावश्यक आहे. व्यापकप्रमाणांत विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड करणेसाठी महाराष्ट्रांतील विविध प्रकारचे कृषीयोग्य हवामान अनुकुल आहे. उत्पादनासाठी आवश्यक मनुष्यबळ आहे. शासनाचे पाठबळ आहे. विविध योजनांद्वारे ग्रामिण जनता, आदिवासी यांना रोजगाराच्या वाढीव संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे औषधी वनस्पती लागवडीस उत्तम वाव आहे.

महाराष्ट्रांतील वृक्षाच्छादनाचे प्रमाण ३३% वर नेण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सर्व संबंधित विभागांकडून "शतकोटी वृक्षलागवड" सारख्या महत्वाकांक्षी कार्यक्रमाव्दारे वनेतर क्षेत्रावर मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड करून उद्दीष्ट साध्य करणेत येत आहे. या वृक्षलागवडी मध्ये फळझाडे व औषधी वनस्पती लागवडीवर भर देणेत येत आहे.

गट लागवड, पाणवहाळ क्षेत्रात लागवड, रस्ता रेल्वे कालवा दुतर्फा लागवड, गावठाण गाव परिसर क्षेत्रात विखुरलेल्या स्वरूपातील लागवड अशा विविध योजनांतर्गत सामाजिक वनिकरण विभाग जलसंधारण कामाबरोबरच वनेतर क्षेत्रावर वृक्ष लागवडीचे काम करीत आहे. जनतेला सातत्यपूर्ण रोजगाराबरोबरच आर्थिक लाभ व्हावा, त्यांचे राहणीमान उंचवावे या दृष्टीने वृक्ष लागवडी मध्ये फळझाडे व औषधी वृक्ष लागवडीवर भर देत आहे.

आपल्या परिसरातील वनस्पती म्हणजे साधन संपतीचा ठेवा आहे. त्याचा संबंध मानव आणि प्राणि यांच्या जीवनाशी अत्यंत निगडीत आहे. त्यामुळे या जीवनव्याप्त वनस्पतींचा परिचय असणे, त्याचा गुणधर्म परिचय असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यायोगे त्यांचा उपभोग घेता येईल, औषध निर्मिती करता येईल, बाजारपेठ मिळविता येईल. उत्तम बियाणे गोळा करून लागवड करून लाभ घेता येईल.

या पुस्तकांमध्ये काही औषधी वृक्षांच्या महत्वपूर्ण बाबींची संक्षिप्त माहिती देणेत आलेली आहे. माहिती सोबत त्या वृक्षांच्या पंचागांचे (मूळ, खोड, पाने, फुले, इ.चे) रंगीत छायाचित्रे देणेत आलेली आहेत. त्यामुळे त्या झाडांचा परिचय सुलभ होऊ शकेल. सामान्य जनतेबरोबर शेतकरी, अभ्यासक-विद्यार्थी, आयुर्वेदप्रेमी सामाजिक वनीकरण, वन, कृषी विभागातील व्यक्तींना या पुस्तकाचा लाभ होऊ शकेल याची खात्री आहे.

**विकास गुप्ता**
मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक
सामाजिक वनिकरण, पुणे वृत्त

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्रातील औषधी वृक्ष

भाग - १

## संकलन व लेखन

अशोक डी.पाटील

## उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, सोलापूर

(या पुस्तकातील मजकुराशी शासन सहमत असेलच असे नाही)



Scanned by CamScanner

यामुळे या सर्वांनी या छायाचित्रांसह माहितीपूर्ण पुस्तक तयार करावे अशी आग्रही विनंती केली होती. परंतु अनुदाना संदर्भातील नियमांमुळे ते उपलब्ध होऊ शकले नाही. व ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकली नाही.

कोणत्याही कामाची सिध्दता ही त्यासाठीचे प्रोत्साहन आणि एकत्रित प्रयत्न यावर अवलंबून असते. हे पुस्तकही त्याला अपवाद नाही. अनेकांचे योगदान व सहकार्यातून हे पुस्तक प्रसिध्द करणेत येत आहे.

मा. श्री विकास गुप्ता मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक पुणे वृत्त यांना ही संकल्पना आवडली व त्यांनी ती त्वरीत मान्य केली. त्यांचे मार्गदर्शनानुसार या पुस्तकामध्ये ४५ वृक्ष प्रजातींची माहिती छायाचित्रांसह देत आहोत. या पुस्तकातील बहुतांशी छायाचित्रे ही महाराष्ट्र व महाराष्ट्र बाहेर मी स्वत: काढलेली आहेत. काही छायाचित्रे ही Internet वरुन Wikipedia- The Free Encylopedia व त्यांच्याशी संबंधित असलेल्या संकेत स्थळावरुन घेतलेली आहेत. याबाबत संबंधितांचे मनस्वी आभार.

पूर्वी पासून या कामी मा. सर्वश्री वी. मजूमदार, अे. वी. भांगरे, ज्वालाप्रसाद, सुरेश केशवाणी, सी. एस्. जोशी, ए. के. झा, एस्. के. अस्थाना, श्री. भगवान, सुरेश थोरात, ए. व्ही. अष्टेकर, व अरविंद आपटे या तत्कालीन वरिष्ठ अधिकारी यांनी प्रशंसा करून प्रोत्साहन दिले बाबत मी त्यांचा ऋणी आहे. मा. ए. के. सक्सेना प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण महासंचनालय म. रा. पुणे यांनी प्रोत्साहन दिलेने सुरवात झालेली आहे. त्याचा मी ऋणी आहे. यापुढे क्रमश: वृक्ष, झुडूप, वेली-क्षुप, तृण वर्गीय वनस्पतींची माहिती देण्याचा मानस आहे. मा. श्री. विकास गुप्ता मुख्य वनसंरक्षक व उपमहासंचालक पुणे यांनी या कामी सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन दिलेने ही संकल्पना प्रत्यक्षात येत आहे याबाबत मी त्यांचा आभारी आहे.

माझे सेहा व इहाणू वनविभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, सामाजीक वनीकरण सोलापूर विभागाचे अधिकारी कर्मचारी, विशेषत: सेहा वनविभागातील जीपचालक श्री. प्रकाश अवसरे व माहिती टंकलेखन करण्यामधे मोलाचे सहकार्य करणाऱ्या श्रीमती के. एफ्. काझी, लिपिक सोलापूर यांनी मोलाचे सहकार्य केले या सर्वांचा मी आभारी आहे.

या पुस्तकातील माहिती वनौषधी विषयांच्या जुन्या ग्रंथांमधून, शासकीय प्रकाशनांमधून, वन, कृषी, आयुर्वेद वैद्यकिय क्षेत्रातील व्यक्तींच्या प्रकाशित साहित्यातून, त्यांचेशी झालेल्या चर्चेतून, वैद्य, ग्रामस्थ यांचेकडून तसेच स्वानुभवातून मिळवलेली आहे. ती संक्षिप्त आहे. लोकांमध्ये वनौषधी बाबत जागृती निर्माण व्हावी त्यांना व सामजिक वनीकरण, वन, कृषी-विभागातील कर्मचारी यांना त्या वनस्पतींची ओळख व्हावी, त्यांना प्रशिक्षणाकामी उपयुक्त ठरावी या शुध्द हेतुने दिलेली आहे. "औषधी गुणधर्मांची पुस्तके वाचून उपचार घेण्यासाठी नसून उपचराची दिशा दाखवणारी असतात" शिवाय औषधी वनस्पतींचा गुणधर्मांचा, आयुर्वेदाचा व्यक्तीपरत्वे स्वानुभव विभिन्न असू शकतो. आम्ही ही माहिती वनस्पतींचे औषधी महत्त्व पटावे, त्यांचा जीवनांत उपभोग घ्यावा, त्यांची लागवड करावी, जोपासना करावी व त्यायोगे अर्थाजन करावे यासाठी अचुक देण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही वनस्पतींच्या कुळ, नांवामध्ये स्थानिक भाषांतील उच्चारातील फरक आणि काही ठिकाणी तज्ञांचे विचारातील मतभेद यामुळे थोडा फरक जाणवण्याची शक्यता आहे.

**सर्वेऽपि सुखानि संतु - सर्वे संतु निरामय:**

अशोक डी. पाटील
उपसंचालक
सामाजिक वनीकरण विभाग, सोलापूर

सोलापूर
दिनांक १७ फेब्रु २०१३



## अनुक्रमणिका


| अ.क्र. | वृक्षाचे नांव | शास्त्रीय नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | अर्जुन | Terminalia arjuna | ०१ |
| २ | अशोक | Saraca indica | ०२ |
| ३ | आवळा | Emblica officinalis | ०५ |
| ४ | आंबा | Mangifera indica | ०६ |
| ५ | कडूनीम | Azadirachta indica | ०९ |
| ६ | कदंब | Neolamarkia cadamba | १० |
| ७ | करंज | Pongamia pinnata | १३ |
| ८ | कवठ | Feronia elephuntum | १४ |
| ९ | काजू | Anacardium occidentale | १७ |
| १० | कांचनार | Bauhinia purpurea | १८ |
| ११ | कांडोळ | Sterculia urens | २१ |
| १२ | कुचला | Strychnos nux-vomica | २२ |
| १३ | कुंभा | Careya arborea | २५ |
| १४ | कोकम | Garcinia indica | २६ |
| १५ | खैर | Acacia catechu | २९ |
| १६ | चंदन | Santalum album | ३० |
| १७ | चिंच | Tamarindus indica | ३३ |
| १८ | जांभूळ | Syzygium cumini | ३४ |
| १९ | टेटू | Oroxylum indica | ३७ |
| २० | डिकेमली | Gardenia resinifera | ३८ |
| २१ | पळस | Butea monosperma | ४१ |
| २२ | पाडळ | Stereospermum chelonoides | ४२ |
| २३ | पांगारा | Erythrina variegata | ४५ |
| २४ | फणस | Artocarpus heterophyllus | ४६ |
| २५ | वकनीम | Melia azadirachta | ४९ |

| अ.क्र. | वृक्षाचे नांव | शास्त्रीय नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| २६ | बकुळ | Mimusops elengi | ५० |
| २७ | बहावा | Cassia fistula | ५३ |
| २८ | बाभूळ | Acacia nilotica | ५४ |
| २९ | बिब्बा | Semecarpus anacardium | ५७ |
| ३० | बेल | Aegle marmelos | ५८ |
| ३१ | बेहडा | Terminalia bellerica | ६१ |
| ३२ | बोर | Ziziphus jujuba | ६२ |
| ३३ | महारूख | Ailanthus excelsa | ६५ |
| ३४ | मोहा | Madhuca indica | ६६ |
| ३५ | रिठा | Sapindus trifoliatus | ६९ |
| ३६ | वायावर्ण | Craeteva religiosa | ७० |
| ३७ | शमी | Prosopis spicigera | ७३ |
| ३८ | शिरस | Albizia lebbeck | ७४ |
| ३९ | शिवण | Gmelina arborea | ७७ |
| ४० | शेवगा | Moringa oleifera | ७८ |
| ४१ | सटवीण | Alstonia scholaris | ८१ |
| ४२ | सावर | Bombax malabaricum | ८२ |
| ४३ | सोनचाफा | Michelia champaca | ८५ |
| ४४ | हिरडा | Terminalia chebula | ८६ |
| ४५ | हिंगणबेट | Balanites aegyptica | ८९ |

| | |
|---|---|
| बियाणे गोळा करणे इ. संबंधी पूरक माहिती. | ९० |
| रोपवाटीका, लागवड संबंधी घ्यावयाची काळजी. | ९२ |
| गुणधर्मांचा सोपार्थ | ९३ |
| संदर्भ सूची | ९५ |




Scanned by CamScanner



# १. अर्जुन

Terminalia arjuna (Roxb) W. A.

**सामान्य नावे** - अर्जुन सादडा, पांढराऐन, (म) कहू, कोहू (हिं) अर्जुन:इंद्रदुम (सं) Arjuna(इं)

**कुळ (Family)** - Combretaceae

**अधिवास, आढळ** - नद्या आणि झ-यांच्या काठावर मोठया प्रमाणांत आढळतो. हिमालय, मध्य भारत, दक्षिण भारत, श्रीलंका. महाराष्ट्रात - कोकण, विदर्भ, दख्खन, सहयाद्री, सातपुडा, अजिंठाच्या डोंगरभागात सर्वत्र.

**सर्वसाधारण वर्णन** - उंच वाढणारा बहुवार्षिक वृक्ष पांढरट लाल साल. लांबट पाने, देठाच्या टोकावर ग्रंथी. जमिनीवर खडकावर लांबपर्यंत सरपटलेली आधार तणाव मुळे. फांद्या जमिनीला समांतर. फुलांचे तुरे बगलेत, पिवळसर, फुलांना मंद सुगंध. फळे-पाच पंखानी युक्त. बी मध्यभागी, पंख खरमरीत जाड.

**गुणधर्म विशेष** - अर्जुन साल- तुरट, मधुर, शीतल, कांतीकारक, बलकर, व्रणशोधक आहे, संसर्गरक्षक, रक्तस्तंभक, मुत्रवर्धक, कफोत्सर्जक, कृमिनाशक, शक्तीवर्धक कामोत्तेजक आहे. अस्थिभंग, पित्त, श्रम, तृषा, दाह, मेह, वायु, हृदयरोग, पंडूरोग, विषबाधा रक्तदोष, दमा, यांचा नाश करतो. अंत:सालीत साखर कमी करणारे द्रव्ये असतात, सालीमध्ये ४३% चुनायुक्तक्षार व ३४ % शुध्दक्षार आहेत. अर्जुन स्वाती नक्षत्राच्या आराध्यवृक्ष व उत्तरा-फाल्गुनी नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे. उदर्दप्रशमन संधनीय गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मुख्यत्वे साल, काही प्रमाणांत पाने फळे.

**उपयोग** - साल- जखमेवर, पोटातील दिर्घकालीन सुजेवर, रक्तरोग, कफ, पित्तप्रकोप, पंडूरोग, दमा, रक्तस्त्राव थांबविणेसाठी, अस्थिभंग, अल्सर धुणे या साठी वापरतात. हृदय रोगावर, हृदयशितलतेवर , हृदयास बल देण्यासाठी, रक्त शुध्दीसाठी वापरतात. व्रणशोध, मुकामार, ठेच, हातपाय मोडणे यावर सालीचा लेप लावतात. पोटातून सालीचा काढा देतात. त्वचेचा वर्ण उजळविणे, तारुण्यापिटीका घालविणे, ज्वर उतरविणे, पित्तत्रास वाचविणेसाठी सालीचा काढा, सालीचे चुर्ण वापरतात. दातांच्या विकारात दंतमंजन म्हणून साल वापरतात. ताज्या पानांचा रस कान दुखीवर वापरतात.

**पुनरुत्पादन** - आर्द्रता असलेल्या जमिनीमध्ये लागवड करावी. पाणथळ- ओलसर असलेल्या जमिनीमध्ये, नदी नाले काठी अर्जुनाची वाढ चांगली होते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# २. अशोक

Saraca asoka (Roxb.) De Wild, S. indica Linn

**सामान्य नावे** - सीतेचा अशोक, तांबडा अशोक (म) अग्नीप्रिया (हिं) शोकहर्ता, शोकनाशी (सं) Asoka Tree (इं)

**कुळ** (Family) - Caesalpiniaceae

**अधिवास, आढळ** - सावली मध्ये वाढणारा, विशेषत: सदाहरित वनांमध्ये. नदी-नाल्यांचा किनाऱ्यावर. पूर्वभारतात. प.घाटांमध्ये कोंकणात बागांमध्ये लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - बहुवार्षिक मध्यम ते मोठा वृक्ष. आंब्याच्या झाडासारखा, भरदार, सुशोभित, सदापर्णी वृक्ष. पाने गुळगुळीत, लांबट, त्यांची किनार अखंड कुरळीदार असते. पाने बीन देठी. नवीन पालवी खाली लोंबणारी, ताबूस रंगाची, झुबकांच्या स्वरूपात असते. फुले-शेंदरी, नारंगी, लाल रंगाची. झुबक्यात येतात. सुगंधी असतात. केसर सुतासारखे बाहेर आलेले. शेंगा-चपट्या, २ ते ४ बिया. तांबड्या- नंतर हिरव्या-पिवळ्या-काळ्या रंगात असतात.

**गुणधर्म विशेष** - अशोक मधुर, शीत, प्रिय, सुगंधी, उष्ण, कडू, तुरट आहे. अस्थीला सांधणारा, कृमिहारक, पित्तहारक, कांतीकारक, स्त्रियांच्या शोकाचा नाशक, रक्तरोग नाशक, वेदनास्थापक, ग्राही संग्राहक, अवसादक आहे. दाह, गुल्म, उदरशूल, अर्श, व्रणशोथ यांचा नाश करणारा आहे. चरक- सुश्रुत यांनी त्याचा समावेश वेदनास्थापन, लोध्रादिगण, अवसादक गणांत समाविष्ट केलेला आहे. पूर्वाषाढा नक्षत्राचा आराध्य तर अनुराधा नक्षत्राचा क्षेत्रकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - साल हेच प्रमुख औषध आहे. फुलांचे चुर्ण.

**उपयोग** - सालीमध्ये Tanin व Catechol भरपूर असलेने मूत्राशयाच्या विकारावर. विटाळाला प्रतिबंध होत असेल तर, स्त्रियांच्या मासिक पाळीच्या बहुतांशी तक्रारीत, अतिरक्तस्त्राव, व गर्भाशयाचे संकुचन, श्वेतप्रदर, रक्तप्रदर यामध्ये सालीचे चूर्ण, काढा वापरतात. सालीचे मलम उघड्या जखमा भरून येणेसाठी, काढा जुलाबावर उपयुक्त आहे. फुलांचे चुर्ण-अंतरक्तस्त्राव, रक्ती आमाशं, अतिसार यामध्ये वापरतात.

**पुनरुत्पादन** - दमट, ओलसर, पावसाळी वनांत, सदाहरित, अर्धसदाहरीत क्षेत्रात उत्तम वाढ होत असलेने अशा क्षेत्रात लागवड करावी. बागांमध्ये, उद्यानांत तसेच शहरांत, वसाहतींमध्ये रस्त्याच्या दुतर्फा लागवड करण्यांस उत्तम. शोभिवत, औषधी वृक्ष आहे. आवश्यकते नुसार ३/४ वर्ष पाणी दिलेस/ठिबक सिंचनाद्वारे पाणी दिलेस उत्तम सफलता मिळते. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner





# ३. आवळा

Emblica officinalis Gaertn, Phyllanthus emblica.

**सामान्य नावे** - आमला, (हिं) आमलकी, धात्री (सं) Embelic myrobalan (इं)

**कुळ (Family)** - Euphorbiaceae

**अधिवास, आढळ** - उष्ण हवामानाच्या जंगलात, डोंगराळ भागात. पाणझडी जंगलात. ४५०० फूट पर्यंतच्या उंचीवर. भारतात सर्वत्र महाराष्ट्रातील जंगलात सर्वत्र. लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराचा पानझडी वृक्ष. साल हिरवट किंवा राखाडी रंगाची. संयुक्त पाने. लहान फांद्यावर- सुक्ष्म फुले. फळे-गोल, हिरवी, तुकतुकीत, रसाळ. बिया-काळपट, तपकिरी एका फळात सहा.

**गुणधर्म विशेष** - आवळा सारक, हितकर, अरूचिकारक आहे. रक्तपित्त, प्रमेह ज्वर, वांती, तहान, सूज, रक्तविकार, यांचा नाश करतो. फळ-कडू, आंबट, तिखट, मधुर, तुरट, शीतल, संसर्गरक्षक, वातानुलोमक, रक्तस्तंभक, पौष्टीक, कफोत्सर्जक, आरोग्य पुन:स्थापक, धातुवर्धक केश्य आहे. बिया-तुरट आणि कामोत्तेजक. फुले-शितल, सौम्यसर आहे. आवळा भरणी नक्षत्राचा आराध्यवृक्ष तर उत्तराभाद्रपदाचा क्षेमकर वृक्ष आहे. चरक-सुश्रुत संहिते नुसार कृष्ठघ्न, विरेचनोपग, कासहर, ज्वरहर, प्रजास्थापन, वयस्थापन गणांतील आहे.

**उपयुक्त भाग** - मुळ, साल, पाने, फळे आणि बिया.

**उपयोग** - फळ-जळजळ, वांती , पित्तप्रकोप, मुत्रस्त्राव, तहान, कुष्ठरोग, बध्दकोष्ठता, दाह, मुळव्याध, हृदयरोग, पांडूरोग, प्रमेह मुत्रदाह, कफ, घाम, मुत्र तयार न होणे यामध्ये वापरतात. रक्त शुध्द करणे, केसांच्या विकारांमध्ये, त्वचेचे सौदर्य वाढविणे कामी आवळा उपयुक्त आहे. फळामध्ये व्हिटॅमिन तसेच पेप्टीन ही अन्नद्रव्ये भरपूर प्रमाणात आहेत. आवळा त्रिफळा चूर्णाचा एक घटक आहे. फळांचा रस थंडावा कमी करणारा, पित्तनाशक, बुध्दीवर्धक उत्तम टॉनिक आहे. सालीचा ताजा रस मध व हळदीबरोबर परम्यामध्ये देतात. आवळ्याचा उपयोग मुरंबा, आवळा सुपारी, मोरावळा व च्यवनप्राश मध्ये करतात. लाकूड टिकाऊ असलेने शेती अवजारे करण्यासाठी वापर करतात. उत्तम जळावू लाकूड आहे.

**पुनरुत्पादन** - आवळ्यासाठी गाळाची, तांबड्या मातीची, उत्तम खोलीची जमीन असावी दमट हवामान मानवते. जास्त उत्पन्न मिळणेच्या दृष्टीने झाडांना कलम करणे आवश्यक आहे. मधुमक्षिकांमुळे परागीभवन मोठ्या प्रमाणावर होत असलेने या क्षेत्रात मधुमक्षिका पालन उपयुक्त ठरते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ४. आंबा

Mangifera indica L.

**सामान्य नावे** - आम (हिं) आम्र (सं) Mango tree (इं)

**कुळ (Family)** - Anacaradiaceae

**अधिवास, आढळ** - विदर्भ, सातपुडा,कोंकण यातील पावसाळी जंगलात. भारतभर सर्वत्र लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - सदाहरित मोठा वृक्ष, घुमटीआकार, मोठे उभट खोड. साल-करडी, भरपूर चिरा असलेली, सालीच्या खपल पडतात. पाने-साधी, वरून तकतकीत लांब, एक फुटापर्यंत लांब. फुले-नरमादी एकत्र, पिवळसर पांढरी, लह फांदीच्या टोकावर तुरे, परिमंजिरी, पाकळ्यांवर गुलाबी रेषा, फळे-रसाळ, एकच बी (कोय) अश्मगर्भीफव कठीण कोय.

**गुणधर्म विशेष** - आंबा-मधुर शीतल, जड, बलकर, धातुवर्धक, पुष्टीकारक, दोषनाशक, कफकर, अग्नीदीपक, मलस्तंभक, प्रि स्निग्ध, तुरट, सुखकारक, कांतीकर आहे. भुकवर्धक, शक्तीवर्धक, पित्तकारक, कफ, वातनाशक, दीपक आतड्यांसाठी स्तंभक आहे. चरक-सुश्रुत संहिते नुसार छर्दिनिग्रहण, पुरिषसंग्रहणीय व मूत्र संग्रहणीय गटा समाविष्ट आहे. आंबा पूर्वा भाद्रपदा नक्षत्राचा आराध्य तर श्रवण नक्षत्राचा क्षेत्रकारक वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, पाने, फुले, फळे आणि बिया. सुकविलेली कोवळी फळे.

**उपयोग** - साल उत्तम रक्त संग्राहक आहे. सालीचा रस धुपणीवर, रक्तमूळव्याधीवर उत्तम फुफ्फुस, आतडी गर्भाशयाती रक्तस्त्राव थांबविणेसाठी उपयोगी. पाने-कोवळ्यापानांचा रस परम्यावर, सूज कमी करणेवर उपयोगी. सालीसक कोवळे फळ-घसारोगावर, उत्तेजक, शक्तीवर्धक, स्तंभक, कफनाशक आहे. कैरीचे पन्हे-रूचकर, क्षुधावर्धक वातानुलोमक, तृषाशामक व उत्साहवर्धक आहे. आमचूर-स्वादिष्ट, मलभेदक, कफनाशक आहे. पक्वफळ सर्वात जास्त चवदार असलेने भारतात लोकप्रिय आहे. बलदायक, शक्तीवर्धक आहे. फळांमध्ये अ,ब,क,ड जीवनसत्वे आहेत. झाडांचा डिंक-पायांचा भेगावर वापरतात. कोय-कृमिघ्न व रक्त संग्राहक आहे. कोयगर (बी) कृमिनाशक, रक्ती मूळव्याधीवर उपायेगी आहे. लाकूड-फळ्या, इमारती बांधकामासाठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - आंबा सर्व प्रकारच्या (अति थंड व अति उष्ण प्रदेश वगळता) हवामानांत, बहुतांशी सर्व प्रकारच्या जमिनीमध् वाढत असलेने आंबा लागवड उपयुक्त ठरते. खोलवर खड्डा खोदून ह्यांमध्ये खतमिश्रीत उत्तम माती भरून लागव करावी. व सुरवातीचे २/ ३ वर्ष रोपांना पाणी द्यावे. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner





# ५. कडूनीम

Azadirachta indica A. Juss.

* सर्व रोग परिहारक वृक्ष * धार्मिक, औषधी, जंतूनाशक, पर्यावरणदृष्टया अत्यंत महत्वाचा असलेला भारतातील वृक्ष

**सामान्य नावे** - नीम, बाळंतनींब, (म) नीम (हिं) निंब (सं) Margosa Tree. Indian Lilack (इं)

**कुळ** (Family) - Meliaceae

**अधिवास, आढळ** - कोरडया प्रदेशांत. भारतभर, राज्यभर सर्वत्र - नैसर्गिक. रस्त्याच्या बाजूला, गांवामध्ये,पडीक जमिनीत सर्वत्र, दख्खन आणि कर्नाटकांत सर्वत्र, विपूल प्रमाणांत लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा सदापर्णी वृक्ष. खोड सरळ. पाने कात्रीदार, संयुक्त, एकांतराने, मधल्या लांब कांडीच्या दोन्ही बाजूस समोरासमोर संयुक्त पर्णिका. फुले-बारीक, सुगंधित, पांढरी डहाळीच्या शेवटी घोस. फळे- लांबट गोल, निंबोळी, कच्ची फळे हिरवी; पक्व - पिवळी व मऊ.

**गुणधर्म विशेष** - नीम कडू, तिखट, तुरट, भुकवर्धक, सूजनाशक आहे. रक्तशुध्दीकर, जंतूनाशक, कृमीनाशक त्वचारोगनाशक आहे. पंचांग - रक्तदोष, पित्त- कफ, व्रण, कृष्ठ व दाह यांचा नाश करतो. कोवळी फळे - मधुर, स्निग्ध, कडू आहे. तेल- किंचित उष्ण, कडू व कृमि, कफ, कुष्ठ, व्रण अर्श पित्तनाशक आहे. नीम उत्तरभाद्रपदा नक्षत्राचा आराध्यवृक्ष तर घनिष्ठा नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष असून 'कंडूघ्न' गणांत समाविष्ट आहे.

**उपयुक्त भाग** - लाकूड, काडया, सर्व अवस्थेतील पाने, फळे, बी, फुले बियांचे तेल. सालीचा आंतील रस.

**उपयोग** - पाने कृमिघ्न आहेत. रक्तावर कार्य करतात. त्वचेचे रोग, खरुज कृष्ठरोग, कफपित्त दोषनाश करतो. मलेरिया व नेत्र रोगावर उपयुक्त. पित्तज्वर, बाळंतरोग,प्रमेह व राजयक्ष्मांत उपयुक्त, गर्भाशयोत्तेजक तसेच गर्भ निरोधकही आहे. नीमपासून टूथपेस्ट, शाम्पू, हेअर टॉनिक, धूप, साबण व अनेक प्रकारची किटनाशके तयार करतात. नीमचे झाड मलेरिया प्रतिबंधक आहे. म्हणून त्याची घरांजवळ, गावठाणात लागवड केली जाते. दांत निरोगी व आरोग्यवर्धक ठेवणेसाठी काडया दांत घासणेसाठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - नीमचे झाड कोरडया हवामानांत, ४०० मि.मि. ते १८७५ मि.मि. पावसाच्या प्रदेशात, ८ ते ४० डिग्री सेल्सि. तपामानांत समुद्रसपाटी पासून ० ते १५००मीटर उंचीपर्यंत चांगले येते. जमिन कोणत्याही प्रकारची काळी, खडकाळ, डोंगराळ जमिनही उपयुक्त आहे. पावसाचे पाण्यावर उत्तम प्रकारे वाढते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ६. कदंब

Neolamarkia cadamba (Roxb) Bosser, Anthocephalus cadamba Mio.

**सामान्य नावे** - नीव (म) कदम (हि) कदंबा (सं) Laran, Kedam (इं)

**कुळ (Family)** - Rubiaceae

**अधिवास, आढळ** - दमट पावसाळी जंगल व मैदानी प्रदेशांत. द.गुजरात, कोंकण, उत्तर कर्नाटक मध्ये आढळतो. शोभिवंत व सावली साठी उद्यानांत, रस्त्याच्या कडेला लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठावृक्ष. खोड फार उंच, फांद्या आडव्या पसरतात. पाने-साधी, मोठी, लांबटगोल, टोकदार समोरासमोर लांबदेठ असलेली चर्मिल. फुले-पांढरट, नारिंगी रंगाची दिखाऊ रात्रीची सुवासिक, झुबक्यांनी येतात. एकांडी, फांद्यांच्या टोकाला पाकळ्या नलीकाकर फळ गोल, पिवळसर गुलाबी, मांसल, संत्राएवढे. पिकल्यावर खातात.

**गुणधर्म विशेष** - साल व फळ तिखट, कडू, तुरट, खारट, शुक्रवर्धक, शीतल, गुरू, रूक्ष,ग्राहक, वातकर असे आहे. रक्तरोग, पित्त, कफ, व्रण, दाह, विष, वायु यांचा नाश करते. फळ पित्तकर आहे. साल-कटू, पौष्टीक, ज्वरघ्न, स्तंभक, गोड, कोमोत्तेजक, आहे. चरक-सुश्रुत संहितेनुसार शुक्रशोधन, वेदनास्थापन गणांत समाविष्ठ आहे. कदंब शततारका नक्षत्राचा आराध्य आणि उत्तराषाढा नक्षत्राचा क्षेत्रकर वृक्ष आहे. कदंब वृक्षास धार्मिक महत्व असून श्री कृष्णाचे प्रतिक म्हणून पूजतात.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, फळे.

**उपयोग** - साल जखमा भरण्यांस उपयोगी आहे. संसर्गरक्षक, गर्भाशयाच्या तक्रारी, रक्तविकार, उन्हाळा लागणे यांत गुणकारी, विषशामक, कफ, पित्तप्रकोप, जळजळ यासाठी चांगले आहे. वारंवार होणारी मूत्र प्रवृत्ती कमी करण्यांस सालीचा काढा व चूर्ण उपयोगी पानांचा काढा किंवा आंतरसाल मुखक्षत, मुखशोथ, तोंड आले असता गुळण्या करण्यासाठी वापरतात. लहान मुलांची टाळू भरून येण्यासाठी सालीचा रस कपाळी लावतात.

**पुनरुत्पादन** - कंदव वृक्षाची लागवड गडद छायेसाठीही मोठ्या प्रमाणांत केली जाते. झाडाखाली ठेवलेल्या वस्तूंचे उन्हापासून संरक्षण होते. रस्ता दुतर्फा व उद्यानांमध्ये लागवड करण्यासाठी उत्तम प्रजाती. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner



# ७.करंज

Pongamia pinnata (L.); P. glabra VENT.

**सामान्य नावे** - करंजी (म) किरमल, कांजा (हि) पूतीकरंज (सं) Indian beech tree, Kerong (इं)

**कुळ** (Family) - Fabaceae

**अधिवास, आढळ** - ओहोळ, नाले-नदी काठी चांगले वाढते. भारतात सर्वत्र विशेषत: समुद्र किनारपट्टी तसेच दाट जंगलामध्ये. कोंकण व घाटावर नदी-नाल्यांच्या काठी मोठ्या प्रमाणावर.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराचा सदाहरीत डौलदार वृक्ष. खोडाचा विस्तार कमी, परंतु घनदाट. गर्द हिरवी, चकचकीत, विषम, संयुक्त पाने. साल पांढरी, गुळगुळीत त्यावर उठावदार पांढरे ठिपके. आंतर साल पिवळी. फुले-पांढरी, किरमिजी, बगलेत मंजिरी, फुलांचे तुरे, फळे करंजी सारखी वक्राकार शेंग, चपट्या टणक, काष्टमय शेंगेत एकच फुगीर मांसल बी. पांढरट-लालसर गुलाबी बी.

**गुणधर्म विशेष** - करंज तिखट, नेत्र्य, उष्ण, कडू, तुरट आहे. वायु, योनिदोष, वातगुल्म, अर्श, व्रण, कफ, वीष, पित्त, कृमि, त्वगदोष, उदरमेद, प्लीहा रोग यांचा नाश करते. करंज-कृष्ठघ्न, आम, वातघ्न, कृमिघ्न, व्रणशोथ प्रतिकार, व्रणरोपण, कासहर आणि पाचक आहे. चरक-सुश्रुत संहितेत करंज कंडूघ्न गणात समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - पंचांग व बियांचे तेल.

**उपयोग** - पाने-वात, अंगदुखी, सांधेसूज यामध्ये पानांचा शेक देतात. पानांचा हिरवे खत म्हणूनही उपयोग होतो. ताजी साल-मूळव्याधी व जखमे किडे काढणेसाठी होतो. मूळाचा रस परम्यामध्ये, फुले- मधुमेहावर आणि बियाचे तेल-त्वचारोगावर उपयोगी आहे. बियांचे तेल व्रणरोपण आहे. गजकर्ण, चाई, लूथ, आगेपण, खरूज, इ. त्वचा रोगांवर कृमिघ्न व जंतुघ्न आहे. वात, अंगदुखी, सांधेदुखीवर तेल चोळतात. तेलांची पेंड उत्तम जंतुनाशक खत आहे. बियांचे तेल-वंगण, इंधन म्हणून वापरतात. बियांमध्ये २७%पिवळे तेल असते.

**पुनरुत्पादन** - नदीकिनाऱ्यावर, पाणथळ जागी, ओलसर, दमट जागेवर, खाडी किनाऱ्यालगत हे झाड उत्तम वाढते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ८.कवठ

Feronia elephantum, Correa; F. limonia (L.) Swingle

**सामान्य नावे** - कांटबेल (हिं) कपित्थ, दधिफला (सं) Wood apple, Elephant apple (इं)

**कुळ (Family)** - Rutaceae

**अधिवास, आढळ** - कोरडया, मोकळया, उघडया जागी, नदींच्या सुपिक खो-यांमध्ये, गुजरात, महाराष्ट्र व दक्षिणेत, तापी नदीच्या खो-यांत भरपूर, घाटावरही भरपूर. बागांमध्ये, उद्यानांमध्ये, रस्त्याच्या कडेला लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा पानझडी वृक्ष. खोडावर काटे, खोड सरळ. साल ओबडधोबड, करडी, काळसर, जाड. पाने-ऋतुपर्णी, एक आड एक, संयुक्त, देठाला लहान.पाने चुरगळल्यास वास येतो. फुले- तांबुस, परिमंजिरी फळे -२ ते ३ इं व्यासाचे, कवच कठीण, रंग करडा. फळांमध्ये पिवळवर, फिकट चॉकलेटी गर, गर खातात, बिया अनेक.

**गुणधर्म विशेष** - कवठ-मधुर, आंबट, तुरट, ग्राहक, शीतल, कडू आहे व पित्त, वायू, व्रण, संग्रहणी, जुलाब, अजीर्ण, आमांश, रक्तपित्त, वीष यांचा नाश करते. पानामध्ये तेल आहे. सुकविलेल्या गरांमध्ये १५ % जंबीराम्ल तर राखे जवखार, चुना, लोह यांचे क्षार आढळतात. पाने वायूनाशी. कवठाचा गुणधर्म-रक्त प्रशमन आहे.

**उपयुक्त भाग** - पाने, फळ, बिया, साल, गोंद

**उपयोग** - सालीचे चुर्ण- हगवण, आमांश, पित्तप्रकोपावर उपयुक्त. पाने सुगंधी मुलांचे पोटदुखीवर, वांती अतिसार, उचकी यांचा नाश करतात. फळांचा गर पौष्टिक, थंड, गोड आहे. खोकला, आमांश, हृदयरोग, घसा, दमा, बध्दकोष्टता, श्वेत प्रदर, रक्तपित्तामध्ये, पित्तप्रकोप, त्रिदोष, रक्ताचा अशुध्दपणा, थकवा, तहान, उचकी, दूर करणेसाठी उपयुक्त. बिया- विषायावर उतारा आहे. मस्तक शूल, विसर्प यांचा नाश करते. कवठाची चटणी, मुरब्बा करतात.

**पुनरुत्पादन** - सुरवातीला कवठाचे रोप हळूवार वाढते परंतु एक - दोन वर्षानंतर त्याची वाढ लक्षणीय असते. बागा, उद्याने, शेताच्या बांधावर, रस्त्याच्या दुतर्फा लागवडीसाठी उत्तम वृक्ष. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner







# १. काजू

Anacardium occidentale L.

**सामान्य नावे** - हिज्जली बदाम (हिं ) काजूतक (सं) cashew nut, cashew gum, apple nut (इं)

**कुळ (Family)** - Anacardiaceae

**अधिवास, आढळ** - मूळ - अमेरीकेच्या उष्ण कटिबंधीय प्रदेशातील. परंतु भारतात विशेषत: समुद्र किना-यावरील भागात स्वाभाविकरण झाले आहे. पश्चिम घाट, कोकणांत - डोंगरी भागात, खाजगी क्षेत्रात बागायती लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम परंतु विस्ताराने मोठा वृक्ष. साल-जाड व घट्ट करडया रंगाची. पाने चर्मिल, पसरट एक आड एक, टोकाकडे बोथट किंवा गोल, लंब वर्तुळी, जालरुप शिरान्यास, विशालकोनी, फुले- पिवळसर, हिरवट, लालसर, पांढरी, गुलाबी पट्टे असलेली, संयुक्त मंजिरी, फळे- छदम फळ (False Fruit). पुष्पस्थली (Thalamus) वाढलेली असते, रंगबेरंगी असतात. कठीण कवची, करडया रंगाची फळे.

**गुणधर्म विशेष** - काजू तुरट, मधुर, उष्ण, लघु, धातुवर्धक आहे. फळे तीक्ष्ण, गोड, खाद्य, कामोत्तेजक, पोषक, अतिसारक आहे व वायू, कफ, गुल्म, उदर, ज्वर, कृमी, व्रण, अग्नीमांद्य, कुष्ठ, संग्रहणी, श्वेतकुष्ठ, अर्श, संग्रहणी, जलोदर यांचा नाश करते. साल आरोग्य पुन:स्थापक आहे. मूळ रेचक आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, बोंड, फळ, बी, फळांची फेणी, बियांचे टरफलाचे तेल

**उपयोग** - सालीचे तेल-हत्ती रोगांवर, प्रक्षोभ कमी करण्यासाठी, कुष्ठरोग, दाद, कुरुप, भिरकारी व्रणात वापरतात. काजू गर पौष्टीक आहे. "अ" जीवनसत्व भरपूर. बाजीकर आहे. गरातील तेल पौष्टीक आहे. बोंडापासून दारु (फेणी) तयार करतात ते उत्तम पेय आहे. अंगदुखी, सांधेदुखीवर चोळतात. दारु (फेणी) उष्ण, स्वेदजनन मुत्रजनक आहे. जीर्ण आमवात, आखडलेले सांधे यावर उपयुक्त आहे. बियांचा चिक- पायांना झालेल्या चिखल्यासाठी फारच उपयुक्त आहे.

**पुनरुत्पादन** - काजु लागवड करण्यापूर्वी कोणते उत्पादन घ्यावयाचे आहे ? या बाबत अभ्यास करुन बियाणांची निवड करावी. काजू फळ, काजू बी, किंवा दोन्ही फळ व बी हवे असल्यास बियाणींची निवड करावी. वेंगुर्ले (जि. सिधुदुर्ग) येथील काजू संशोधन केंद्रातून काजूच्या ६ ते ८ जाती आढळतात. त्यातून निवड करावी. (परिशिष्ट पहावीत.)

Scanned by CamScanner

# १०. कांचनार

Bauhinia perpurea L.

**सामान्य नावे** - कांचन (म) गुरियल, कच्चर (हिं) कांचनार, कोविदरा (सं) Orchid Tree Camel's foot tree (इं)

**कुळ (Family)** - Caesalpiniaceae

**अधिवास, आढळ** - पानझडी जंगलात. विदर्भ, सातपुडा, पश्चिम घाट-कोकणांतील पानझडी जंगलात. संपूर्ण महाराष्ट्रांत उद्यांनामधून, रस्त्याच्या कडेला शोभिवंत वृक्ष म्हणून लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराच्या पानझडी वृक्ष. पाने- ऋतुपर्णी, दुभागलेली, हृदयाकृती असतात. नवीन घुमारे करड्या रंगाचे असतात. फुलांच्या रंगानुसार तीन प्रजाती आहेत. पिवळ्या फुलांचा-कांचन, किरमिजी रंगाचा कोविदर व पांढऱ्या रंगाचा कांचनार, शेंगा शिकेकाई सारख्या लांब चपट्या १५ ते २० से.मी. लांब व १ ते २ से.मी. रूंद. पाकळ्या ४ मंजिरी. वर्षातून ३/४ वेळा फुले येतात.

**गुणधर्म विशेष** - कांचनार-ग्राहक, तुरट, मधुर, रूचकर आहे. दमा, खोकला, पित्त, रक्त विकार, प्रदर यांचा नाश करतो. कोविदर-शीतल, सारक, अग्नीदीपक, तुरट आहे. व कफ, पित्त, व्रण, कृमी, कुष्ठ, वायु रक्तपित्त यांचा नाश करतो. सालीमध्ये टॅनिन, बियांत Fatty Oil असते. चरक - सुश्रुत संहितेत वमनोपग गणांत सामिल आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, फुले-कळ्या

**उपयोग** - साल-आरोग्य, पुन:स्थापक, पौष्टीक, स्तंभक, भूकवर्धक आहे. पित्तप्रकोपकारक, कफ, क्षयग्रंथी, कुष्ठरोग यांत गुणकारी आहे. गुद्द्वाराचा त्रास, खोकला, दमा, रक्तरोग, व्रण, योनिस्त्राव यांत गुणकारी. कृमीनाशक, तृषारोग, जळजळ मासिक अतिस्त्राव, अशुध्द रक्त, शुलार्तव, त्रिदोष यांत उपयोगी, मेदस्वी व्यक्तीस व ग्रंथी शोथमध्ये पोटातून देतात. फुले साखरे सोबत सौम्य रेचक आहे. गंडमाला, दाह, व्रणावर देतात. वाळविलेल्या कळ्या शीतल, स्तंभक आहेत आणि मूळव्याध, आमांश, अतिसार आणि कृमितही देतात. जखमा भरणेसाठी गंडमाळा बसणेसाठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - उद्यानांमध्ये, बागांमध्ये, शहरातील रस्त्याचे कडेला लागवड करणेस उत्तम वृक्ष. (परिशिष्ट पहावीत.)





Scanned by CamScanner





# ११. कांडोळ

**Sterculia urens Roxb.**

**सामान्य नावे** - सारढोल, कहांडोल, कड, (म) कुलु, कराईगम (हिं) Kulugum tree, kutira gum(इं)

**कुळ (Family)** - Sterculiaceae

**अधिवास, आढळ** - दक्षिण उष्ण कटीबंधीय आर्द्र कदापर्णी तसेच कोरड्या कदापर्णी वनांत. उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, आंध्र, तामीळनाडू, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात पश्चिम घाट, सातपुडा व विदर्भातील वनांत प्रामुख्याने आढळतो.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराचा वृक्ष. खोड तांबूस पांढऱ्या रंगाचे, बुंध्याकडे फुगीर, पुढे गोलाकर सरळ वाढणारे. साल - गुळगुळीत पातळ. पाने पंजाकृती, एरंडाच्या पानासारखी, पाच टोके असलेली व एका आड एक, प्रत्येक फांदीच्या टोकाला जास्त प्रमाणात. फुले - पिवळसर रंगाची फांद्याच्या टोकाला येतात. त्यांना उग्र दर्प असतो. फळे सुरवातीला हिरवट पुढे पक्व झाल्यावर लालसर तांबूस रंगाची. बिया गडद तपकिरी रंगाच्या चकचकीत असतात. एका फळात ३ ते ६ बिया असतात. फळे झुबक्यांच्या स्वरुपात असतात. फळांवर बारीक लव असते. झाड बहुतेकवेळा निष्पर्ण असते. कड्या कपाऱ्यातही चांगले वाढते.

**गुणधर्म विशेष** - साल- शीत वायुनाशी आहे. बी- पौष्टीक, उत्तेजक आहे. डिंकाचा संपर्क पाण्याशी आला तर डिंकाचा मूळ आकार अनेक पटीने फुगतो. बियांमध्ये तेल असते. मूळ थंड असते.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, पाने, बी, डिंक, खोडाला केलेल्या घावातून निघणारा स्राव म्हणजेच 'कटीला' 'कराया' गम होय.

**उपयोग** - साल पाण्यात घालून ते पाणी उकळवून त्याने स्नान केलेस शीण, वात नाहीसा होतो. साल अतिसारावर उगाळून देतात. मूळ व सालीचा रस-परमा, गरमी व धातू विकारावर उपयुक्त आहे. पाने व कोवळ्या फांद्या याचा रस फुफ्फुसकोश शोथात लावतात. डिंक औषधाच्या कॅप्सुल्स, बबलगम, च्युईंगम, आईसक्रिम, चॉकलेट उद्योगांत वापरतात. गरमी प्रमेह व धुपणीवर डिंक साखरेसोबत पाण्यांत कालवून देतात. घशाच्या रोगांत डिंक चघळतात. पौष्टिक व उत्तेजक असलेने बिया भाजून खातात.

**पुनरुत्पादन** - ७०० ते ३००० मि.मि. पाऊस १५ ते ४५ डिग्री सेल्सि. तापमान, समुद्रसपाटीपासून ते ५०० मी. उंचीच्या प्रदेशात चांगला निचरा होणाऱ्या, वाळू मिश्रित, खडकाळ, मुरमाड, लालसर, (जांभा दगडाची) माती असलेल्या क्षेत्रात ही प्रजाती चांगली वाढते. बियांमध्ये तेल असलेनो बिया लवकर खराब होणेची ही शक्यता असते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# १२. कुचला

Strychnos nux - vomica Lin.

**सामान्य नावे** - काजरा (म) कुपिलू, कजरा (हिं) विषतिंदुक विषद्रुम (सं) Crowfig, The Snake Wood Tree, Nuxvomica, Poison nut tree (इं)

**कुळ** (Family) - Loganiaceae

**अधिवास, आढळ** - ओलसर मोसमी जंगल. भारतभर कमी अधिक प्रमाणांत, उत्तरप्रदेश, कर्नाटक, तामीळनाडू उत्तरकर्नाटक, दक्षिण कोकण व जांभ्या दगडाच्या समुद्रालगतच्या जंगलात विपुल.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम ते मोठ्या उंचीचा वृक्ष. कोकणांत सदापर्णी तर खानदेशात पानगळीचा वृक्ष आहे. फांद्या एकमेकांच्या विरूध्द बाजूस असतात. कोवळ्या फांद्यावर मजबूत टोकदार काष्टमय काटे असतात. साल-पातळ, साधारण गुळगुळीत असते. पाने-वर्तुळाकार टोकदार, वरुन चकचकित तर खालून तपकीरी लव असलेली. फळे-टेंबुर्णी, चिकू फळाएवढी गोलाकार नारंगी रंगाची. फळांत राखाडी रंगाचा चिकट गर असतो. त्यामध्ये अनेक बिया गोलाकार चपट्या व एका बाजूला खोलगट असतात.

**गुणधर्म विशेष** - विषारी आहे. बियांमध्ये स्ट्रीकनीन व ब्रुसीन ही विषारी द्रव्ये असतात. फळ-तुरट फार कडू, तिखट, उष्णताकारक, ज्वरशामक आणि आतड्यांना स्तंभक आहे. पाने-कडू व विषारी आहेत. त्रिकोणी फुलांना हळदीसारखा वास. वृक्ष-मदकर, ग्राहक, कडू, लघु उष्ण आहे. कुष्ठरक्तविकार, वातरोग, अर्श, ज्वरनाशक आहे. पिकले फळ विष, पाककाळी मधुर, कफ, वायू, प्रमेह, पित्त व रक्तविकार यांचा नाश करते. कुचला अश्विनी नक्षत्राचा आराध्य तर पूर्वा भाद्रपदा नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - बिया व फळे. क्वचितपणे-पाने व लाकुड साल

**उपयोग** - फळ-वात, कफ, कोड, रक्तरोग, खाज, मुळव्याध, व्रण, मुत्रस्राव, कावीळ, सांध्यातील दुखणे, कटीशुल, गजकर्ण, पक्षाघात आणि अवयवांचा कमकुवतपणात उपयोगी आहे. किंचित पौष्टिक कामोत्तेजक आणि आर्तव जनक आहे. भांगे ऐवजी बियांची थोडीमात्रा घेतात. महत्त्वाचा मादक पदार्थ आहे. जास्त मात्रेत ते 'मारक वीष' आहे. बिया शुध्द करून घेतल्या शिवाय वापरत नाहीत. सालीचा फांट व काढा ज्वरनाशक आहे. ताज्या सालीचा रस कॉलरा व तीव्र आमांशात देतात. पाने कडू व अत्यंत विषारी असलेने पाने खाल्याने गुरे मरु शकतात. पाने, फुले, लाकूड सर्वच भाग विषारी त्यामुळे माहितगार वैद्याशिवाय-वैदूशिवाय कोणीही हया झाडाचा कोणताही भाग घरी आणत नाहीत व वापरत नाहीत.

**पुनरुत्पादन** - ओलसर जमिनीत नदी नाल्या काठच्या गाळ्याच्या पुळण मिश्रित मातीत काठावर उत्तम प्रकारे वाढ होते. समुद्र किनाऱ्या लगतच्या भागात तसेच ओल टिकून राहणाऱ्या निचरायुक्त माती मध्ये उत्तम प्रकारे वाढ होते. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner



# १३. कुंभा

Careya arborea (Roxb)

**सामान्य नावे** - कुंभी (हिं) कालिंदी, कुमुदिका (सं) cylon oak tree, patana oak , wild guava (इ)

**कुळ** (Family) - Lecythidaceae

**अधिवास, आढळ** - पानझडी जंगलात. महाराष्ट्रातील सर्व वनांत. कोकणांत सर्वत्र डोंगर उतारावर.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा पानझडी वृक्ष. खोड मध्यम उंच. साल-ओबडधोबड जाड. आंतरसाल लाल तंतूमय लांब रूंद. दोन्ही बाजूंनी गुळगुळीत चकचकीत पाने, साधी, समोरासमोर. फुले येण्याच्या वेळेला कोवळ्या फांद्या गुलाबी होतात (हिवाळ्यात). उन्हाळ्यांत पाने गळतात. फुले-पांढरी, पुंकेसर, जांभळट, फांदीच्या टोकाला फुलांचे झुबके. पांढऱ्या फुलांमध्ये ठसटशीत भरपूर गुलाबी आणि जांभळे पुंकेसर, त्यामुळे फुले गुलाबी किंवा जांभळी भासतात. फुलांना घाण वास येतो. फळ-चेंडूसारखे गोल, बेला एवढे, उघड्या तोडांचे फळ. त्यातून स्त्रीकेसर-किंजनळी बाहेर पडलेली दिसते. बिया पुष्कळ.

**गुणधर्म विशेष** - तिखट, उष्ण, तुरट, ग्राहक, कोरडा, संसर्गरक्षक आहे. व पित्त, वात, कफ, दाह, ज्वर, रक्तातिसार, योनिदोष, कृमि, मूत्रस्त्राव, मूळव्याध, यांचा नाश करतो.

**उपयुक्त भाग** - मुख्यत्वे साल. काही प्रमाणात फळे, पाने

**उपयोग** - साल-कोरडा खोकला, स्त्रियांची धुपणी, पिडादायक सूजेवर, व्रणधुणे, दमा, उन्हाळे लागणे, भाजलेल्या ठिकाणी, जखमा धुणे, सर्प दंशाच्या ठिकाणी लावणेस, अपचन, वात, श्वासानलीका दाह, मूत्रस्त्राव, मूळव्याध, त्वचारोग, अपस्मार, आकडी, यांत उपयोगी आहे. फळ-कामोत्तेजक असून कफावरही उपयोगी आहे. थंडी, पडसे यावर उपयुक्त आहे. फळे-जनावरांच्या औषधात ही देतात. पानांमध्ये २०% टॅनिन असते. सालीपासून मजबूत दोर तयार होतो. लाकूड चांगल्या प्रतीची मिळते.

**पुनरुत्पादन** - उद्यानांमध्ये लागवड करतात. संमिश्र प्रजातीच्या लागवडीसाठी उत्तम. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# १४. कोकम

Garcinia indica (Dup) Choisy

**सामान्य नावे** - रातांबा, आमसोल (म) साराम्ल (हिं) वृक्षाल्म (सं) Kokum butter, Goa butter (इं)

**कुळ** (Family) - Clusiaceae

**अधिवास, आढळ** - पश्चिम घाटांत, विशेषत: कोंकण, कर्नाटक मलबार भागात. बागांमध्ये लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - लहान मध्यम वृक्ष. खोड-उंच. साल-करडी, लोंबकळत्या फांद्या, फांद्यांवर लव. पाने गुळगुळीत, गर्द हिर कोवळेपणी तांबडी बकुळीच्या पानाच्या आकारासारखी. फुले-नरफुले बगलेत, मादी फुले-एकांडी. फळे-वाटो लिंबाएवढी, सुरवातीला हिरवी, पिकल्यावर लालसर गुलाबी. बी-गुळगुळीत ४/८ बिया.

**गुणधर्म विशेष** - हिरवे फळ-तुरट, आंबट, रूचीकर, अग्नीदीपक, उष्ण, तिखट, पित्तकारक, कफकर आहे. व वातोदर, व्रण, वा अतिसार यांचा नाश करते. पिकलेले फळ-रूचीकर, ग्राहक, अग्नीदीपक, तिखट, उष्ण, आंबट, तुरट व रू आहे. कफ, वायू पित्त, आमातिसार, आमवात, संग्रहणी, रक्तदोष, अर्श, शूल, गुल्म, व्रण, कृमि, वातोदर यां नाश करते. चरक-सुश्रुत संहितेनुसार दीपनीय, श्वासहर गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मुख्यत्वे फळे व बिया. क्वचित-पाने व साल.

**उपयोग** - कोकम फळास रातांबा म्हणतात तर त्याच्या सुकविलेल्या कापास आमसोल. गरापासून सरबत तयार करता बियांमध्ये १०% तेल असते. ते मेणासारखे घट्ट असते. त्यास कोकम बटर. कोकम तेल,भिरंडेल म्हणता कोकमचे सूपास 'सोलकढी' म्हणतात. सरबत-तृषानाशक, पित्तनाशक, रोचक, दीपन, पाचन, ग्राही आणि र पित्त प्रशमन आहे. आमसोल-पथ्यकर व पित्तनाशक आहे. कोकम तेल-स्तंभक, व्रणरोहण आहे. हातापायाच कापऱ्यावर, भेगांवर जळवातावार, आगेपणावर उपयुक्त आहे. आमसोलाचा फांट-अतिसार, संग्रहणी आणि र आंवेत देतात. कोवळी पाने-अतिसार, संग्रहणी, पित्त, जळवात, मुळव्याध, वायगोळा यावर उपयोगी आहे.

**पुनरुत्पादन** - या झाडांमध्ये नर व मादी झाडे असतात. म्हणून खात्रीशीर रोपे घ्यावीत. १५/२० झाडांमागे एक नर झाड ठेवू बाकीची काढून टाकावीत. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner











# १५. खैर

Acacia catechu (L.F.) Wild

**सामान्य नावे** - कत्था, खैर (हिं) खदिर (सं) Cutch, Khayer (इं)

**कुळ (Family)** - Mimosaceae

**अधिवास, आढळ** - दमट पानगळीची वने व उष्ण कटीबंधीय काटेरी वने. महाराष्ट्रात सर्वत्र. अत्यंत आर्द्रता असलेला, थंड व सततचा अवर्षणग्रस्त भाग सोडून भारतात सर्वत्र आढळतो.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराचा पानझडी वृक्ष. खोड उंच. पर्ण विस्तार मध्यम-हलका. देठाच्या मध्यभागी खोलगट ग्रंथी. पर्णिकांच्या जोडीमध्ये लहान ग्रंथी. फांद्या बारिक काटेरी. तपकिरी रंगाचे जोडीने येणारे काटे. साल बाहेरून गडद तपकिरी किंवा राखाडी रंगाची कठीण. आतंरसाल लाल, तपकिरी, गाभा लाकूड-तांबडे भडक किंवा चॉकलेटी तांबडे. फुले-पिवळसर गुलाबी, लांबट लोंबकळणाऱ्या फुलांचे तुरे. शेंगा पातळ, चपट्या, तपकिरी रंगाच्या त्यात काळे बी.

**गुणधर्म विशेष** - खैर-पाचक, शीत, कडू, तुरट, रक्त शुध्दीकारक, दातांना हितकारक आहे व कफ, पित्त, कृमि, कंडू, ज्वरशोथ, खोकला, मेद, प्रमेह, आम, पंडू व रक्त दोष यांचा नाश करतो. चरक-सुश्रुत संहितेनुसार कुष्ठघ्न, उदर्दप्रशमन, स्तन्यजनन गणांत समाविष्ठ आहे. खैर मृग नक्षत्राचा आराध्य आणि भरणी नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - लाकूड, साल, डिंक.

**उपयोग** - सालीचा काढा रक्तपित्त, दंतरोग, त्वचारोग, व्रण धुण्यास, कुष्ठ रोगांत, अशक्तपणा, गर्भाशयाची शिथिलता, पित्तविकार, खोकला, जीर्णज्वर, यावर उपयोगी. लाकूड उकडून काथ तयार होतो. काथ बाळंतपणानंतर दुध सुटण्यास, स्तंनाना पुष्ठी येण्यास, पित्त विकार, धुपणी रक्तस्त्राव बंद होणेस उपयोगी आहे. खैर सार (Resin) घसा रोगावर उपयोगी आहे. प्रमेह, कुष्ठरोग यावर उपयुक्त. खैर साल दंतमंजन तयार करतात झाडावर लाखेचे किडे पोसले जातात. काथ हा खाद्य व अखाद्य म्हणून रंग-डाय म्हणून उपयोगी. लाकूड मृदंग बनविणेसाठी, बैलगाडीचे तुंबबनविणेसाठी, चांगले इंधन म्हणून उपयोगी.

**पुनरुत्पादन** - नदी काठच्या रेती मुरमापासून बनलेल्या गाळाच्या सच्छिद्र जमिनीत उत्तम वाढ होते. (परिशिष्ट पहावीत.)

# १६. चंदन

Santalum album Lin.

**सामान्य नावे** - सफेद चंदन, संदल (हिं), गंधसार भद्रसार (सं) Sandalwood Tree (इं)

**कुळ (Family)** - Santalaceae

**अधिवास, आढळ** - कोरड्या, पावसाळी व पानझडी, उष्ण हवामान प्रदेशात.जंगलात.पश्चिम द्विपकल्प, कर्नाटक, तामिळनाडू, नाशिकपासुन दक्षिणेकडे, कोकण दक्षिण महाराष्ट्राच्या कोरड्या पानझडी-पावसाळी जंगलात लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - १० ते १५ मीटर उंचीचा, सदापर्णी, लहान, बहुवार्षिक वृक्ष. पाने-२.५ ते ५ सेमी लांब अंडाकार, हिरवीगार निमुळती साधी, समोरासमोर, पुढे टोकदार. खोड-काळे. फुले-जांभळट, व्हायलेट किंवा करड्या रंगाची शेंड्याला, बगलेत, परिमंजिरी, वल्लरी लहान. फळे-लहान १.२ सेमी व्यासाची गोल, जांभळट, काळी, चकचकीत.

**गुणधर्म विशेष** - चंदन शीत, संसर्गरक्षक, सुरभी, हृद्य आहे. ज्वरशामक, कामोत्तेजक, कांतीकारक आनंदकारक, निद्राजनक, संकोचकारक व दाहशामक आहे. पित्त, भ्रम, ज्वर, वांती, कृमि, संताप, दाह, श्रम, मुखरोग व रक्तदोष यांचा नाश करते. वास प्रसन्नकारक आहे. चरक सुश्रुत संहितेनुसार वर्ण्य, कंडूघ्न, दाहप्रशमन, अंगमर्दप्रशमन, तृष्णा निग्रहण गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - खोड, मुळ, काष्ठ-तेल, बियांचे तेल

**उपयोग** - सौंदर्यप्रसाधने निर्मिती व त्वचारोगांसाठी, तेल उपयुक्त आहे. हृदयरोग, कफ, तृषारोग, पित्त प्रकोप, जळजळ, डोक्यातील सर्दी, श्वासनलिका दाह, दिर्घकालीन सूज, परमा, डोकेदुखी मध्ये उपयुक्त आहे. चंदनाचे लाकूड व तेल दोन्ही थंडावा देणारे डायफोरेटिक आणि कफ निवारक आहे. दाहमध्ये, उष्णता वाढली असलेस, शरीलाला लेप लावतात. त्यामुळे दाह कमी होतो. चंदन लाकडापासून शोभिवंत वस्तू तयार करतात.

**पुनरुत्पादन** - चंदन मुळे सुरवातीच्या काळात Partial Parasite असतात. त्यामुळे सोबतच्या रोपांचे आधारे जगतात. त्यासाठी चंदन बी पेरणे आधी पिशव्यांमध्ये बाभूळ, बोर, निलगिरी, तूर इत्यादीचे बी पेरावे. हे बी रूजलेवर चंदन बी पेरावे. साधारणत: १ वर्षाची रोपे लागवडीसाठी उत्तम. निचरा होणाऱ्या जमीनीमध्ये लागवड करावी. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner



# १७. चिंच

Tamarindus indica Lin.

**सामान्य नावे** - इमली (हिं) अम्लिका, आमला (सं) Indian date, Tamarind Tree (इं)

**कुळ (Family)** - Caesalpiniaceae

**अधिवास, आढळ** - पावसाळी जंगलातील सावलीचा भाग. बहुतेक उष्ण प्रदेश. देशभर गावाजवळ, पडीत जमिनीवर, रस्त्याचे दुतर्फा लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा सदापर्णी वृक्ष. पाने-संयुक्त, एका आड एक, पर्णिकांच्या १० ते २० जोड्या. फुले-लालसर, पिवळसर, गुलाबी पट्टे असलेली मंजिरी प्रकारात. फळे-७ ते २० सेमी लांब जाड-वाकड्या शेंगा. बिया-चिंचोके ३-१२ गर्द तपकीरी, काळपट. झाड अत्यंत कणखर व चिवट. दुष्काळी भागात केवळ पावसाच्या पाण्यावर येते.

**गुणधर्म विशेष** - चिंच-तुरट, स्वादु, आंबट, रूचिकर, अग्नीदीपक, लघु आहे व वायु, कफ प्रमेह यांचा नाश करते. फुले-भुकवर्धक. फळ-आंबट, चविष्ट. बी-आतड्यांना स्तंभक, कामोत्तेजक, बी कृमीनाशक आहे. साल-स्तंभक आणि पौष्टीक, व्रण भरणारी आहे. पाने-दाहक व सुज कमी करणारी आहेत. फळाच्या गरामध्ये अ व क जीवनसत्त्वे आहेत. कोवळया चिंचा अति आंबट ग्राहक, उष्ण. रक्त यांना कोपविणाऱ्या व वातनाशक आहेत. चिंच-कडुपौष्टिके गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - साल, पान, फुले, फळे, बी

**उपयोग** - फळ-हृदयासाठी चांगले, शक्तीवर्धक, कृमीनाशक व खोकल्यासाठी उत्तम तृषारोग, घसा दुखणे यांत उपयोगी. पाने-वाटुन सूज व गजकर्णावर वापरतात. साल-पक्षाघातात, स्पर्शज्ञान गेल्यास उपयोगी. सालीची राख परम्यांत देतात. डोळ्यांचे रोग, कान दुखणे, बध्दकोष्ठता, खोकला सर्दीवर पाने-फुले वापरतात. यकृत, आमाशय, आतडे यांच्या शैथिल्यांत चिंचेचा वापर करतात. बीया कामोत्तेजक असुन गरगरणे आणि भोवळ यांत उपयागी आहेत. फुले व फळांचा वापर सॉस, सिरप व चटणी तयार करणेसाठी. पितळी भांडी स्वच्छ करणेसाठी चिंच व मीठ वापरतात. बिया-स्तंभक असल्याने त्यांचा पोटीस म्हणून वापर करतात.

**पुनरुत्पादन** - चिंच २५० मि.मि. ते २७०० मि.मि. पावसात ९ ते ४० डिग्री सेल्सि. तापमानात व ० ते १५०० मीटर समुद्रसपाटीपासुनच्या उंचीवर येते. निचरा होणाऱ्या विविध प्रकारच्या जमिनीत चिंचेची वाढ होते. नवीन सुधारीत प्रजाती पासून ७ ते ८ वषानंतर फळांचे उत्पन्न सुरू होते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# १८. जांभूळ

## Syzygium cumini (L) Skeeis

**सामान्य नावे** - जामन, जामुन (हिं) जंबू, जांबू (सं) Black Java Palm (इं)

**कुळ** (Family) - Myrtaceae

**अधिवास, आढळ** - पानझडी जंगलात नद्यांच्या खोऱ्यात, नदी काठी, ओलसर जागी, देवरहाटीमध्ये बागा, उद्याने, रस्त्याच्या कडेला लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - सदाहरीत मोठा वृक्ष. खोड-पांढरट. पाने-समुख, चर्मिल, गुळगुळीत, चमकदार, देठाकडे निमुळती. फुले-मळकट पांढरी, लहान-मोठ्या गुच्छांमध्ये फुलांची जोडी केसर लांब हिरवट पांढरे. फळ-बोराच्या आकाराचे लांबट, अंडाकृती. अपरिपक्व-हिरवे. परिपक्व-जांभळट काळे, रसदार, मांसल. बी एकच.

**गुणधर्म विशेष** - साल-तुरट, पाचक, आतड्यांसाठी स्तंभक आणि कृमिनाशक. फळे-तुरट, गोड, शीत, शुष्क, स्तंभक. फळांचा शिरका (आसव) पौष्टीक, स्तंभक, वायुनाशी. बिया मूत्रवर्धक. सालीमध्ये १३ ते १९% टॅनिन आहे. चरक सुश्रुत संहितेनुसार छर्दिनिग्रहण, पुरूषविरंजनीय गणात समाविष्ट आहे. जांभूळ रोहीणी नक्षत्राचा आराध्य तर अश्विनी नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - साल, फळे, बी, पाने

**उपयोग** - साल-श्वासनलीकांच्या सुजवण्यावर दम्यात, क्षतांत, अतिसारावर, रक्तातिसार, मधुमेह, ओकारीवर, रक्त शुध्दीकरण्यासाठी, दांत दाढ घसा दुखणे यावर उपयोगी. फळांचा गर-मधुमेहावर, बियातील मगज-मधुमेहातील यकृत क्रिया बिघडली असेलतर, घामोळींवर उपयुक्त. पाने-पित्तावर. कोवळ्या पानांसा रस लहान मुलांच्या हगवणीवर. फळांचा आसव-मधुमेह, अतिसार, संग्रहणी बांवेत उपयोगी. जांभूळ शरीरास हितकारक आहे. जांभळाजवळ असलेल्या पाण्यांत शेवाळ होत नाही. लाकूड पाण्यांत कुजत नाही. लाकूड घर बांधकामासाठी उपयुक्त आहे.

**पुनरुत्पादन** - ६०० मिमी. ते ५००० मिमी. पावसाचे प्रदेशात. आहोळ, नदी, नाले काठी. ओलसर जमिनीत चांगलीर वाढ होते. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner



# १९. टेटू

Oroxylum indicum (L.) Vent

**सामान्य नावे** - टेटव(म), श्योना, अरलू (हिं) श्योनक, अर्लू (सं) Indian trumpet flower (इं)

**कुळ (Family)** - Bignoniaceae

**अधिवास, आढळ** - ओलसर, दमट जंगलात. कोकण-पश्चिम घाट, सातपुडा-विदर्भ यांतील दमट, ओलसर जंगलात. महाराष्ट्रातील बहुतांशी वनांत.

**सर्वसाधारण वर्णन** - लहान वृक्ष १-२ मीटर वर फांद्या फुटतात. साल-विटकरी रंगाची मऊ, सालीला छेद दिसतात. पाने मोठी ४ ते ५ फुट लांब, संयुक्त पाने, फांद्या पोचट, पाने, ऋतुपर्णी टोकदार देठाळ, सरळकांठ, हिवाळ्यात पाने गळतात, उग्र दर्प. फुले-शेंड्याला तुरा, गर्द लाल देठ, लहान, फुलांचा झुपकेदार तुरा येतो, फुले दिखाऊ तुतारीच्या आकारासारखी. शेंगा २ ते ३ फुट लांब, तलवारीच्या म्यानासारखा आकार. शेंगामध्ये पसरट हलक्या बिया असून त्यावर पांढरा किंवा पारदर्शक पापुद्रा असतो. शेंग उघडताच बिया वाऱ्याने इतस्तत: उडतात.

**गुणधर्म विशेष** - टेटू-तुरट, कडू, तिखट, अग्नीदीपक ग्राहक, शीतल, बलप्रद, आतड्यांयाठी स्तंभक, हृदय आहे व वात, पित्त, कफ, अरूचि, आमवात, कृमि, वांती, खोकला, अतिसार, तृष्णा, कुष्ठ, श्वासनलीका दाह, ताप, आमांश याचा नाश करतो. साल स्तंभक, वातहर, कडू, तिखट आहे. दशमूळ (बृहत्पंचकमूळ) पैकी आहे. चरक-सुश्रुत संहितेनुसार शोथहर, शीतप्रशमन, पुरिषसंग्रहणीय, अनुवासनोपग गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, मूळाची साल

**उपयोग** - मुख्य उपयोग सूज व त्यापासून होणारी पीडा दूर करणे आहे. टेटू मूळ-कर्णशूल गर्मी, शोथ, वातप्रधान रोगांत उपयुक्त आहे. स्वेदजनन, वेदनास्थापन, व्रणरोपण व स्तंभन आहे. टेटूच्या काढ्याने आमवातातून सुजलेले सांधे शेकतात. टेटू साल-सर्वातिसार, रक्तस्राव, व्रण, प्रेमह, रक्तातिसार, सर्व प्रकारची गरमी मूळव्याध यासाठी उपयुक्त आहे. सॅलिसिलीक ॲसिड सारखे टेटू हे उत्तम औषध आहे. (जोपर्यंत टेटू आहे तोपर्यंत भारताला सॅलिसिलीक ॲसिडची गरज नाही असे म्हणतात)

**पुनरुत्पादन** - जलदगतीने वाढणारे झाड आहे. ओलसर-दमट जागेत वाढ उत्तम वाढते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# २०. डिकेमली

Gardenia resinifera, Roth; G. lucida Roxb.

**सामान्य नावे** - डिकेमली(म) डेकामारी (हिं) नाडीहिंगू (सं) Dekamalle gum, Resintree (इं)

**कुळ** (Family) - Rubiaceae

**अधिवास, आढळ** - कोरडे, पानझडी जंगल. भारत, ब्रह्मदेश कोकण व दक्षिणकडे. विदर्भ-सातपुडा मधील नैसर्गिक जंगला बागांमध्ये, उद्यानांमध्ये लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - लहान-मध्यम वृक्ष, खोड-पांढरट. पाने-पेरूंच्या पानासारखी, देठरहीत, शेंड्यांची पाने सुवासिक. फुले-पांढरी, ३ फुलांचा झुपका. फळे-लांबट गोल, ४-५ कप्पे. फळांची साल-पातळ. फळाला टोक असते. बिया भर असतात. झाडांच्या-फांदीच्या डेखाच्या अग्रातून हिरवट-पिवळा ओलसर तकाकणारा स्राव/डिंक येतो त्य डिकेमली म्हणतात. हिवाळ्यांत जास्त येते.

**गुणधर्म विशेष** - डिकेमली-तिखट, तीक्ष्ण, अग्नीदीपक, पाचक आहे. भूकवर्धक, आतड्यांसाठी मलस्तंभक, वातनाशक कफनाशक, स्वेदजनन, त्वग्दोषहर आहे. कफ, वायु, मलबंध, मनाचा मोह, आम, यांचा नाशे करते संकोचविकास प्रतिबंधक, कोष्ठवात प्रशमन, कृमिघ्न, नियतकालीक ज्वरनाशक आहे. डिंकाला उग्रवास येते

**उपयुक्त भाग** - डिकेमाली व सालीपासून निघाणारा डिंक

**उपयोग** - विशेषत: बालकांसाठी दंतोद्भवणाच्या वेळी हगवणीवर, ज्वरावर, अपचनजन्य पोटातील वायुसाठी, गोलकृमीव खायला देतात. जंतामध्ये कृमिघ्न व सौम्य रेचक म्हणून वापरतात. आतड्यांतील वायु नाहीसा करणे, जंतपाडणे गुरांच्या जखमेवरील किड मारणे, त्वचा रोग व जखमांवर कीड संरक्षक म्हणून वापरतात.

**पुनरुत्पादन** - बागा, उद्यानामध्ये शोभिवंत-वृक्ष म्हणून लागवडीसाठी उत्तम आहे. (परिशिष्ट पहावीत.









# २१. पळस

Butea monosperma (Lam) Tau. B.frondosa Roxb.

**सामान्य नावे** - पलस (हिं), पलश, त्रिपत्रक (सं) Bengal kino tree, Flame of the forest (इं)

**कुळ (Family)** - Fabaceae

**अधिवास, आढळ** - मिश्र मोसमी जंगल. भारतात व राज्यभर मिश्र मोसमी जंगलात सर्वत्र.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराचा ओबड-धोबड वाढणारा वृक्ष. साल तांबुस राखाडी. झाडाला छेद घेतला तर खोडातून तांबडा रंगाचा डिंक निघतो. एका लांब देठाला गोलाकार तीन पाने. हिवाळ्यात पाने गळतात. नवीन पाने येण्याआधी लाल केशरी रंगाची फुले येतात. फुले बोटभर लांब गुच्छांनी येतात. त्यावर मऊ लव असते. शेंग चपट लोंबकळणारी. शेंगेमध्ये एकच बी असते.

**गुणधर्म विशेष** - पाने-स्तंभक, फले-मूत्र प्रवृत्तीकर, ग्राहक, स्वादु, तुरट, वातुळ, शीतल, कडू, लघु,व तिखट, साल- विरेचक, भूकवर्धक, डिंक-आतड्यासाठी स्तंभक दीपक, तुरट टॅनिन-युक्त. पळस पुर्वा नक्षत्राचा आराध्य वृक्ष व पुष्य नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - मुळ, साल, पाने, फुले, बी, डिंक

**उपयोग** - मुळे-रातांधळेपणा, हत्तीरोग, पाने - तारूण्यपिटीका, केसतुट रक्तार्शामध्ये बाह्य उपयोगावर आणि साल-भुकवर्धक, कृमिनाशक, अस्थिभंग व गुदद्वाराचे विकारावर उपयुक्त आहे. फुले- त्वचारोग, कफरोग उन्हाळे लागणे, संधिवात खोकला, मुखरोग, प्रमेहावर उपयोगी आहे. फळ-कामोत्तेजक व कफोत्सर्जन आहे. बी-कृमीनाशक आहे. गोंद/डिंक-टॅनिनयुक्त असलेने अतिसार व आमांशात लहान मुलांना देतात. सालीचा सौम्य काढा सर्दी व कफ दुर करण्यासाठी वापरतात. पळसाची पाने - पत्रावळी द्रोण तयार करणेसाठी व घरे शाकारण्यासाठी वापरतात, खोडावर लाखेचे किडे पाळतात.

**पुनरुत्पादन** - नैसर्गिकरित्या विपुल प्रमाणांत पळस उपलब्ध असलेने लागवडीचे प्रमाण अत्यल्प आहे. इतर प्रजाती बरोबर संमिश्र लागवड करणे उपयोगी ठरते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# २२. पाडळ

Stereospermum chelonoides (L.F.) DC; S. Suaveolens

**सामान्य नावे** - पारल (म) पाडेर, पाढ्री (हिं) पाटला (सं) Fragrant Padru Tree (इं)

**कुळ (Family)** - Bignoniaceae

**अधिवास, आढळ** - डोंगराळ प्रदेशांत. महाराष्ट्रातील सर्व वनांत. विशेषत: विदर्भ, कोकण, सातपुड्याच्या जंगलात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा, ऋतुपर्णी वृक्ष. खोड सरळ उभे. पुष्कळ फांद्या, भूमी समांतर, वरच्या उभ्या. साल-खडबडीत उदी रंगाची. पाने-समोरा, संयुक्त पाने, ७ ते ११ जोड्या, टोकास एक पान विषम, लंब, गोल, टोकदार. फुले-मोठी तुऱ्यांनी येतात, घंटाकृती, तुतारीच्या आकाराची, पिवळी, जांभळट छटा व सुवासिक, त्रिकोणासारखी परिमंजिरी. शेंगा १ ते २.५ फूट लांब, शेंग चार कडा युक्त, शेंगावर पांढरे ठिपके, वाटोळे वळण, पिकल्यावर करड्या रंगाची बी-पातळ, पापुद्र्यासारखे पंख पारदर्शक. झाडावर दिर्घ काळ शेंगा राहतात. एका शेंगेत २०० पर्यंत बिया असतात.

**गुणधर्म विशेष** - उत्तर भारतातील 'पाटला' प्रमाणे दक्षिण भारतात 'पाडळ' दशमूळ (वृहत्पंचक मूल) म्हणून वापरतात. दशमूळ काढा-उष्ण, कडू, गुरू, सुगंधी, पौष्टीक, धातुवृध्दीकर, मधुर, शीतल, वातहर, अवसादक आहे. रक्तदोष, अरूचि, सूज, दमा, तृषा, उचकी, कफ, वायू, ज्वर पित्तविकार यांचा नाश करते. चरक-सुश्रुत संहितेनुसार 'शोथहर' गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, मूळाची साल, पाने, फळांचा रस.

**उपयोग** - मूळांचा रस, उलटी, कफ, वात व आम्लपित्त यावर उपयुक्त आहे. मूळांचा फांट ज्वरामध्ये उपयुक्त. फुलांचा फांटाने पचन चांगले होऊन पित्त निघून जाते. पाने-पित्तविकार, उन्हाळे घालविते. फळांचा रस उचकीवर. फुलांचा गुलकंद पचनशक्ती वाढविणे. मुळ-पोटदुखी, विषावर उपयुक्त. साल व मूळ-पित्तनाशक, ज्वरनाशक, वातहर आहे. कुपचनावर उपयुक्त आहे.

**पुनरुत्पादन** - शेताच्या बांधावर, पडीक जमिनीवर लागवडीस उत्तम. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner



# २३. पांगारा

Erythrina variegata L, E. indica Lam.

**सामान्य नावे** - पारंगा (म) फरहद, पांजीरा (हि) परिभद्र, किंशुकः (सं) indian coral tree (इ)

**कुळ (Family)** - Fabaceae

**अधिवास, आढळ** - भारतात अंदमान, निकोबार व पानझडी प्रदेशांत. महाराष्ट्रात कोकण, सातपुडा, विदर्भाच्या जंगलात. मिरीवेल, पानवेली, द्राक्षमळे इ. वेलींना आधार देणेसाठी व शोभेचे झाड म्हणून सर्वत्र लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम उंचीचा पानझडी वृक्ष. वेडेवाकडे खडबडीत खोड. हिरवट फांद्यावर पिवळसर रंगाचे नंतर गळून पडणारे पापुद्रे. गुलाबी-लाल रंगाचे फुलांचे घोस. वृक्ष निष्पर्ण असतांना फुले येतात. शेंगा फुगीर १५ ते ३० सेमी लांब मूत्र पिंडाच्या आकाराच्या फुगीर बिया. दुसऱ्या प्रजातीत शेंगा ५ ते १० सेमी लांब व लहान बिया.

**गुणधर्म विशेष** - पांगारा-उष्ण पथ्य, अग्नीदीपक, अरूचीकारक आहे. पांगारामूळ-आर्तवजनक गणांत समाविष्ट आहे.

**उपयुक्त भाग** - साल, पान, मुळे, फुले

**उपयोग** - साल-ज्वरहर, शोथहर, कृमिघ्न आहे. आमांश, कफ आणि वातात वापरतात. पित्तविरोधक आहे. पाने-कृमिनाशक, भूकवर्धक, मूत्रल, दाह (शोथ) यांत गुणकारी. पानांचा रस कान दुखीवर आणि पीडानाशक म्हणून दंतवेदनांमध्ये उपयुक्त आहे. फुले-कर्ण व्याधी व पित्तरोग नाशक आहेत. दात दुखीवर वापरतात. पांढऱ्या फुलांच्या जातीच्या झाडांची कोवळी मुळे वाटून, थंड दुधाबरोबर कामोत्तेजक म्हणून देतात. साल व फुले-कावीळ धातूविकार, वात, रक्तादिदोष, रक्त मिश्रीत आंवेत उपयुक्त. लाकूड हलके व मऊ असलेने खेळणींसाठी वापरतात. फांदीची लागवड करून आधारासाठी वृक्ष तयार होत असलेने पान मळे, द्राक्षमळे यांत वेलींना आधारासाठी लागवड करतात.

**पुनरुत्पादन** - फांदीची लागवड (Vegctative Propagation) केल्यासही वृक्षाची वाढ चांगली मिळते. (परिशिष्ट पहावीत.)

# २४. फणस

Artocarpus heterophyllus, Lam; A. integrifolia L.F.

**सामान्य नावे** - कंथाल, कटहर (हिं) कंटकफल, पनस (सं) Jack Fruit (इं)

**कुळ (Family)** - Moraceae

**अधिवास, आढळ** - उष्णकटीबंधीय. उष्ण व दमट हवामान प्रदेशात. पश्चिम घाट-कोकण, कोल्हापूर, नाशिक, सातारा, पुणे घाट डोंगराळ भाग व विदर्भातील उष्ण, दमट जंगल.

**सर्वसाधारण वर्णन** - सदाहरित मोठे झाड. खोड सरळ, मोठे, काष्ठमय. पाने-विशाल कोनी, गुळगुळीत. जालरूपी शिरान्यास, ४ ते इंच लांब, गडद. हिरव्या रंगाची लांबट, कोवळी पाने एका बाजूने चकाकतात. फुले-नर व मादी फुले निरनिरा असतात. फळे-लांबट गोल, विविध आकारांत ओबडधोबड, वजन ३ किलो पासून ३० किलोपर्यंत ही असता फळातील गरे खातात. बी-अर्धवर्तुळी, फार पिठूळ असतात.

**गुणधर्म विशेष** - हिरवा फणस-मलावष्टंभक, मधुर, बलकर, तुरट, वातुळ कोवळा फणस-मधुर, बलकर, कफप्रद, मेदावृध्दीक पक्व फणस-शीतल, वायुनाशी, रक्त पित्तनाशी आहे. फळांत 'अ'व 'क' जीवनसत्त्वे आहेत. फळ-पौष्टीव स्निग्ध, कामोत्तेजक, मलबध्दताकारक आहेत. फणस उत्तराषाढा नक्षत्राचा आराध्य वृक्ष तर जेष्ठा नक्षत्राचा क्षेमक वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - पाने, फळे, बिया

**उपयोग** - झाडाच्या बुंध्यावर येणारी फणस-अळंबी मुखरोगावर उगावळून लावतात. साल-रक्तातिसार, मोडशी, लह मुलांची आमसंग्रहणी यावर उपयोगी. कोवळे फणस-सारक, खूप पोषक, पचनास जड आहे. रसाळ फण आवडीने खातात. गरे सुकवून तळून खातात. त्याची खीर व कढी करतात. चेचून वाळवून उसळ करतात. फळां चारखंड गुरांना खायला देतात. त्यांचे दुधाचे वाढीस उपयोगी आहे. चिक-गळवांवर उपयोगी. लाकूड-होड्य फळ्या फर्निचरसाठी उपयुक्त.

**पुनरुत्पादन** - उत्पन्नाचे / उपजिविकेचे एक महत्त्वाचे साधन म्हणून कोकणांत या वृक्षाची लागवड होते. बागा, उद्याने रस्त्य कडेला लागवड करण्यासाठी उपयुक्त वृक्ष.(परिशिष्ट पहावीत.)





Scanned by CamScanner











# २५. बकनीम

*Melia azadirachta* L.

सामान्य नावे - बकाण, बकनींब (म) बकैन, बकायन (हिं) कैटर्य (सं) Persion Lilac, Bastard cedar (इं)

कुळ (Family) - Meliaceae

अधिवास, आढळ - उत्तर भारतात. काश्मिर, हिमालयाचा पायथा. शोभिवंत झाड म्हणून बागेत लागवड करतात.

सर्वसाधारण वर्णन - सरळ, उंच, दिखाऊ. कडूनीम सारखी पाने. गुलाबी, किरमिजी सुवासिक फुलांचे घोस. दिर्घकाळ लटकणारे पिवळ्या गोल बोराएवढ्या फळांचे घोस. बियाला मध्यभागी आरपार भोक. बियांच्या माळा करतात. फुले बगलेत येतात. फळे अश्मगर्भी (Drup). मुळे विषारी आहेत.

गुणधर्म विशेष - बकायनीम-तिखट, कडू, वांती, प्रमेह, गुल्म, अर्श, दमा यांचा नाश करतो. पाने-प्रमेह, कफ, दाह, व्रण, रक्तदोष, कृमि, विषमज्वर, हृदयव्यथा, कुष्ठ वांती, प्रमेह, गुल्म, अर्श दमा यांचा नाश करतो. पाने-प्रमेह, कफदाह, व्रण, अर्श दमा नाशक आहेत.

उपयुक्त भाग - फुले, पाने, मूळाची साल

उपयोग - बियांचे तेल-चर्म रोगावर, गर्भाशयाची व्याधी दूर करते. पाने कृमिघ्न, त्वग्दोषहर, गर्भाशयास संकोचक, वेदना स्थापन आणि शोधक आहेत.जंत मरतात जंत ज्वर कमी होतो. बाळंतपणातील डोक्यातील चाई, रक्त दोषामुळे उद्‌भवलेले त्वचा रोगावर उपयोगी.

पुनरुत्पादन - शोभिवंत झाड. शेताच्या बांधावर, विशेषत: केळी, ऊस इ. बागायती शेताच्या बांधावर लागवडीस उत्तम. उद्यानामध्ये रस्त्याच्या कडेला लागवडीस उत्तम. (परिशिष्ट पहावीत.)

Scanned by CamScanner

# २६. बकुळ
Mimusops elengi (L)

**सामान्य नावे** - ओवळी (म) मोलसरी (हिं) मुकुल (सं) Indian medlar (इं)

**कुळ (Family)** - Sapotaceae

**अधिवास, आढळ** - कोकण, उत्तर कर्नाटकातील पावसाळी जंगल. भारतात, महाराष्ट्रात सर्वत्र देवळांच्या आवारात, बागांम शोभिवंत, धार्मिक झाड म्हणून लागवड करतात. दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात.

**सर्वसाधारण वर्णन** - सुबक - सदापर्णी वृक्ष, मध्यम उंचीचा .पाने साधी, एका आड एक, दोन्ही टोकास निमुळती, चकचकीत.खो सरळ. साल- करडी. शेंडा दाट झुपकेदार. फुले- लहान चक्रकार पांढरट-खाकी रंग, मध्यभागी छिद्र. अत सुगंधीत. फळे-बदामाएवढी, मांसल, पिकल्यावर शेंदरी तांबट, तुरट. पिकल्यावर खातात.

**गुणधर्म विशेष** - बकुळ-शीतल, मधुर, हृद्य, तुरट, हर्षद, ग्राहक, गुरू आहे. दंतरोग, कफ, पित्त, वीषदोष, कृमि यांचा नाश कर साल कषाय, पौष्टीक आहे. फुले- रोचक. फळे-स्नेहन संग्राहक आहेत. फुले मनोहर सुवासिक आहेत. फुलांम 'इसेन्सीयल ऑईल' असते. बियांमध्ये 'सॅपोनीन' आहे. बकुळ अनुराधा नक्षत्राचा आराध्य तर चित्रा नक्षत्र क्षेत्रकारक वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - साल, मूळ, फळे

**उपयोग** - साल- दंतरोग, हिरड्या घट्ट होण्यासाठी, गर्भधारणा करणे करीता, जीर्ण ज्वर, पृष्टी करणार्थ उपयुक्त. साली काढा-हृदय रोग, पौष्टीक आहे, ज्वरनाशक आहे. स्त्रियांची जनन क्षमता वाढविणे. फुलांचा अर्क-फु कफोत्सर्जक असून पित्त लक्षणे, यकृत तक्रारी, डोकेदुखी, नाकविकार, ज्वरामध्ये व अंग साफ करणे का उपयुक्त कच्चे फळ-दात बळकट करतात. फळे-दंतरोग, अतिसार मोडशी आवेमध्ये डांग्या खोकला याव उपयोगी. पक्व फळ-रक्त आंवेमध्ये देतात. बिया पोट दुखीवर उपयुक्त आहेत. लाकूड खाऱ्या पाण्यांत जा टिकते म्हणून होडीसाठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला, तसेच देवळांच्या आवारांत गावामध्ये पडीक जमिनीवर लागवडीस उत्तम (परिशिष्ट पहावीत.)





Scanned by CamScanner







# २७. बहावा

Cassia fistula Lin.

**सामान्य नावे** - बावा (म) अमलतास (हिं) आरग्वद (सं) Golden Shower, Indian laburnum (इं)

**कुळ (Family)** - Caesalpiniaceae

**अधिवास, आढळ** - मिश्र मोसमी जंगल, बहुतांश भारतात. महाराष्ट्र सर्वत्र. लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - लहान पानझडी वृक्ष. फांद्या पसरट पाने संयुक्त, एका आड एक, लांब पर्णिका ४ ते ८ जोड्या लांबट, अंडाकृती. फुले उठावदार, सोनेरी पिवळी लोंबकळणारी पुष्प संभारात फुलांचे घोस, १ ते २ फुट पर्यंत झुंबरासारखे लांब असतात. फुलांना मंद सुगंध असतो. शेंग मोठी १ ते ३ फुट लांब दंडगोलाकृती, मोठी रूळासारखी, काळी पिंगट, आंत भरपूर गर व चपट्या बिया.

**गुणधर्म विशेष** - पाने - रेचक, कफ, मेह नाशक, आवर्ती, ज्वर शोधक. फळे - सौम्य विरेचक व ज्वरशामक . शीत, कडू आहेत. फुले-स्वादु, कडू, ग्राहक, तुरट आहे. फळ - पाचक, शीतल, तिखट, बलकर, मगज - मृदू, मधूर, स्निग्ध आहे. व पित्त, वायु यांचा नाश करणारा आहे. मूळ - शक्तीवर्धक. बहावा दाहशामक, वेदनास्थापन व अनुलोमिक आहे. चरक-सुश्रुत संहिते नुसार कुष्ठघ्न व कंडूघ्न गणात समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मुळे, पान, फुले, फळे, बिया, फळांचा मगज (आरग्वद)

**उपयोग** - मुळ - पौष्टीक आहे. तापावर उपयोगी. कोवळ्या पानांचा रस - चर्मरोगांवर. बियांचे चुर्ण मधुमेहावर, साल घशातील गाठी सुजून पाणी उतरत नसेल तर १०/२५ ग्रॅम साल पाण्यांबरोबर उकळून ते पाणी थोडे थोडे घ्यावे. व्रणशोथ, वातरक्त व आमवातामध्ये शोथावर गराचा लेप देतात. गर जास्त प्रमाणांत पोटातून घेतल्यास हगवण व पोटांत मुरडा येतो. व्रण भरण्यास, संधीवात, पित्तप्रकोप, हृदयरोग, उदरशूळ, गर्भपातन, संधीवात, पक्षघात यामध्ये पाने, फुले, फळे, बिया मूळ उपयुक्त आहे. बध्दकोष्ठतेवर कमी प्रमाणांत गर देतात. गरम सौम्य रेचक असलेने लहान मुलांना व गर्भवती स्त्रियांना सुरक्षित आहे. मुळ हे अधिक मात्रेत दिलेस शक्तीशाली रेचक आहे.

**पुनरुत्पादन** - बागांमध्ये, रस्त्याचे दुतर्फा ठराविक अंतराने, ओळीने लागवड केलेस शोभिवंत झाड म्हणून अत्यंत उपयुक्त ठरते (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# २८. बाभूळ

Acacia nilotica (L) wild A. arabica

**सामान्य नावे** - बाभूळ (म) बबूल, किकर (हि) बब्बूल, (सं) Indian gum Arabic tree (इं)

**कुळ (Family)** - Mimosaceae

**अधिवास, आढळ** - कमी पावसाचे प्रदेशांत. कोरड्या, काळ्या जमिनीत. नदीच्या खोऱ्यांच्या प्रदेशात. महाराष्ट्रात सर्वत्र

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम काटेरी वृक्ष. फांद्याना भरपूर पांढरे काटे. उंच वेडेवाकडे खोड. साल-काळी, खवले युक्त, पांढरा डिंक. मजबुत लाकूड. फुले- पिवळ्या रंगाची, वाटोळी, झुपकेदार. शेंगा लहान सुरवातीला पांढरी भुरकट नंतर काळी.शेंगेत ५ ते १० बिया. तपकिरी काळ्या चकचकीत बिया. पाने- चिंचेसारखी. संयुक्त एका आड-एक, पर्णिका अनेक.

**गुणधर्म विशेष** - बाभूळ- कडू, मधूर, स्निग्ध, शीत, उष्ण, तुरट, आहे.आम, रक्तातिसार, कफ, खोकला, पित्त, वायु. दाह, प्रमेह, कृमि, श्वासनलीका दाह, आतिसार, पित्त प्रकोप जळजळ, मुळव्याध कोड, मुत्रस्त्राव यांचा नाश करते.

**उपयुक्त भाग** - साल, पाने, डिंक

**उपयोग** - साल-जोरदार व मौल्यवान संग्राहक आहे. त्यामध्ये लवणाम्लक्षार आहेत. काढा-मुखरोग व दंतरोग, घसारोग, अस्थिभंग-मूख रोगांवर. कोवळी पाने- अतिसार, आम्लपित्त, लघवीतून रक्त पडणे, वात, अस्थिभंग, नेत्र रोग यामध्ये उपयोगी. शेंगामध्ये २२% कषायद्रव्ये आहेत. ती गारवा निर्माण करणारी आहेत. बी-अस्थीभंग, नारू, धातुपुष्ठता तर डिंक अतिसार, आमांश मधुमेह धातुपुष्ठता यावर उपयोगी. काड्या हिरड्या व दांत सदृढ करणेसाठी, त्यांचा दांत घासणे साठी दातून म्हणून वापरतात. डिंक रक्तस्तंभक असून कुष्ठ रोगांत. कफोत्सर्जकारक असून यकृतासाठी पौष्टीक, धातुष्ठतेस उपयोगी. ज्वरशामक, रक्त शुध्दी, घशांचा त्रास यांत उपयोगी आहे.

**पुनरुत्पादन** - प्रतिकुल वाळवंटी हवामान, जमीन यामध्ये सर्वत्र वाढते. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner











# २९. बिब्बा

Semecarpus anacardium (L.F.)

**सामान्य नावे** - भिलावा, बिब्बा (म) भिलामा, भिल्वा (हिं) वातारी, भल्लातकी (सं)

**कुळ (Family)** - Anacardiaceae

**अधिवास, आढळ** - पानझडी कोरडे जंगल. राज्यभर कोंकणात, देशावर, दख्खन पठारावर, विदर्भात. तसेच गुजरातच्या कोरड्या जंगलात, मैदानात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम-मोठा पानगळीचा वृक्ष. साल-भुरकट, जाड, खपल्या पडतात. पाने-मोठी, जाड पांढरी, हिरवी अगर पिवळी, देठाला लहान. पानांच्या कडा जाड, व कडक, चर्मिल, फांदीच्या टोकाला पाने. फुले-पांढरी मंजिरी स्वरूपांत, बगलेत, काजूसारखी छद्मफळ.फळांचा देठ मोठा होऊन काजूच्या बोंडाप्रमाणे दिसतो. त्याला बी असते. बोंड सुकवून बोंडफुल होते. खाण्यास योग्य आहे. बी मधील गरांस 'गोडांब्या' म्हणतात. बिब्बाचे झाड सहसा कोणी तोडत नाहीत. कारण कुऱ्हाडीच्या घावाने खोडातून निघणारा चिक कातडीला अपायकारक असतो. बिब्बाच्या भोवतालची हवा आरोग्याला हितकारक नसते. म्हणून बिब्ब्याच्या झाडाखाली झोपू नये असे म्हणतात.

**गुणधर्म विशेष** - फळ-उष्ण, पाचक, कामोत्तजक, कृमिनाशक असून वात, कफ, जलोदर, त्वचारोग, मुळव्याध, आमांश ताप, भूक न लागणे, मूत्रस्त्राव यावर उपयोगी आहे. व्रण भरणे व दांत मजबूत करणेस उपयोगी आहे. बिब्बा पित्तसारक आहे. चरक-सुश्रुत संहितेमध्ये बिब्बा भेदनीय, दीपनीय, कुष्ठघ्न, मूत्रसंग्रहणीय, पित्तसारक व अवसादक गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - फुले, फळ, बिब्बा, बिब्बा तेल, गोडांबी, शेवते

**उपयोग** - बिब्बा-मुळव्याध, गंडमाला, तिव्र जीर्ण आमवात, अल्सर, फुप्फुसरोग, खोकला, मुर्च्छा, अर्धशिशी अंडवृधी, कफाबरोबर रक्त येणे व वातज रोगांत वापरतात.गोडांबी, पौष्टीक वायुहारक, दांतास बळकटी देणाऱ्या व वाजीकरणा वर उपयुक्त आहेत. बिब्बा गरम केलेवर पडणारे तेल म्हणजे 'शेवते'. शेवते हाडी व्रणावर, गरमी, परमा, दमा, अजीर्ण, मज्जातंतू रोग नायटा, खवडा, पायांच्या भेगा, फुफ्फुस रोगांवर उपयोगी आहे. बिब्बा तेल दुखऱ्या जागे व्यतिरिक्त अन्यत्र शरीराला लावू नये. त्रासदायक फोड येतो. बिब्वाच्या रसाने परीट कापडावर खुणा करतात म्हणून या वृक्षांस ऊप markcing nut tree असे संबोधतात.

**पुनरुत्पादन** - खोडातून निघणाऱ्या अपायकारक चिकामुळे. बिब्वाची झाडाची गांवात, गावाचे जवळ पास, बागांमध्ये लागवड करीत नाहीत. पडीक जमिनीमध्ये संमिश्र स्वरूपांत लागवड करावी.(परिशिष्ट पहावीत.)

# ३०. बेल

Aegle marmelos (L.) correa

**सामान्य नावे** - बेली, सिरफल (हिं) बिल्व (सं) Bengal quince, Bael Tree (इं)

**कुळ** (Family) - Rutaceae

**अधिवास, आढळ** - भारतभर कोरडया डोंगराळ भागात. सपाट मैदानी भागांतही वन्य किंवा उत्पादित. कोकण,विदर्भ, सातपुडा, दक्षि पठारावर, देवळाजवळ, बागांमध्ये लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराच्या कांटेरी, पानझडी, वृक्ष. खोड-पांढरट, पाने-संयुक्त, त्रिदली, विशिष्ट गंध असलेली. काटे बळकट, तीष्ण. फुले- हिरवट, पांढरट, सुवासिक, लहान. फळे ६ ते १० सेमी व्यासाची, पिवळट व गुळगट नारंगी रंगाचा ग-यांमध्ये बहुबीज.

**गुणधर्म विशेष** - बेल- मधुर, हद्य, तुरट, उष्ण, रुचिकर, दीपक, ग्राहक, रुक्ष, पित्तल, ज्वरनाशक, तेलकट, उत्तेजक अँटीपायरेटीक आणि अँटी फॉस्फरबुटीक आहे. वातनाशक, भूक वाढविणारे पौष्टीक, गोड, सुगंधी, शीत धर्म असलेले रेचक आहे. चरक- सुश्रुत संहितेनुसार अर्शोघ्न, विरेचनोपग, आस्थापनोपग, अनुवासनोपग, शोथहर, ज्वरघ्न गणांत समाविष्ट आहे. चित्रा नक्षत्राचा आराध्य तर पूर्वा नक्षत्राचा क्षेम कर वृक्ष आहे. दशमुळांपैकी महत्वाचे मूळ व धार्मिक वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - सर्व भाग औषधी. मूळ, साल, पाने, फळे, खोडाचा गाभा, मुळांची साल

**उपयोग** - मूळ-त्रिदोषांचे तापावर, उदरशूल, हृदयाचे धडधडणे, चित्तोन्मादकता, ज्वरनाशक, खिन्नता-विकार यामध्ये गुणकारी. वात, कफ मध्ये उपयोगी. ताजी पाने- ज्वरनाशक. कोवळ्या फळांच्या चकत्या (बेल काचरी) करतात. ह्या काचऱ्या मुलांच्या हगवणीवर, आमांश, अतिसार, दुखणे दूर करणेवर, पोटाचे विकार, श्लेष्मकाला, दुर्बलतेवर वापरतात. पक्व फळे-तृषारोग, वांती, भूक वाढविणारे, हृदय मेंदुसाठी चांगले. आल्हाददायी अनुलोमक असून अपचनासाठी सोपा उपाय. मुरब्बा (मार्मालेड) दिर्घकालीन आमांशात व अतिसारात देतात. फळांचा रस- दिर्घकालीन परम्यामध्ये उपयुक्त.

**पुनरुत्पादन** - या वृक्षाला धार्मिकदृष्ट्या पानांसाठी तसे आयुर्वेदीय दृष्ट्या (सर्व भाग औषधी असलेने) फार मागणी आहे. बागांमध्ये, उद्यानांमध्ये, शेताच्या बांधावर, मंदिर परिसराबरोबर पडीक क्षेत्रातही या वृक्षाची चांगली लागवड होऊ शकते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner





# ३१. बेहडा

Terminilia bellerica (Geertn.) Roxb.

**सामान्य नावे** - वेहळा, हेला (म) बैरा, बहेडा (हिं) बिभितक (सं) Belleric Myrobalan (इं)

**कुळ (Family)** - Combretaceae

**अधिवास, आढळ** - संमिश्र पानझडी जंगल. (कोरड्या पश्चिम भारतातील वाळंवटी प्रदेश सोडून सर्वत्र) राज्यभर पानझडी मोसमी जंगलात. पश्चिम घाटात विपूल. खानदेश विदर्भातही प्रमाण चांगले.

**सर्वसाधारण वर्णन** - विस्ताराने मोठे झाड. खोड उंच. सालीवर उभ्या चिरा. पाने ऋतुपर्णी, लांब, चर्मिल, फांद्यांच्या शेंड्याला एक वटलेली, एका आड एक. फुले- पिवळसर, फिकट हिरवी, लहान, दुर्गंधी युक्त. फळे-हिरवट, भुरकट सुकल्यावर भुसभुशीत, वाटोळी, देठाकडे थोडी लांबट, निमूळती, करडी, ५ कंगोरे. फुल व पान चुरगळल्यास त्यांना उग्रदर्प येतो.

**गुणधर्म विशेष** - बेहडा-तिखट, कडू, तुरट, उष्ण, सारक, केशवर्धक, शीतस्पर्श, भेदक आहे व नासारोग, रक्तदोष, कंठरोग, नेत्ररोग, खोकला, हृदयरोग, जंतू यांचा नाश करतो. कासहर, श्वासहर, स्वरभंगहर आहे. फळांचे टरफल-संग्राहक, श्लेष्मघ्न आहे. बी-मादक, कैफी वेदनास्थापन, शोथघ्न आहे. चरक सुश्रुत संहितेनुसार बेहडा विरेचनोपग व ज्वरहर गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - फळ, फळांचे टरफल, गर, तेल

**उपयोग** - कच्चे फळ रेचन करणारे तर पक्व फळ रेच थांबविणारे आहे. फळातील गर जास्त खाल्ल्यास मादक. कफ रोगावर व खोकल्यावर उपयोगी. फळाचे टरफल-साल-जखमा भरून काढणे वातावर, श्वास, कासावर, खोकल्यावर, घटसर्पावर, घसा व श्वास नलीका त्रासावर उपयोगी आहे. तेल-पांढरे डाग व केस काळे करण्यासाठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - बेहडा उद्यानामध्ये, शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला लागवड करणेसाठी उत्तम वृक्ष आहे. (परिशिष्ट पहावीत.)

# ३२. बोर

Ziziphus jujuba Lam; Z. mauritiana Lam.

**सामान्य नावे** - बेर (हिं) बदर, बदरिका (सं) Indian jujube, Indian cherry plum (इं)

**कुळ (Family)** - Rhamnaceae

**अधिवास, आढळ** - भारतात सर्व प्रदेशांत. उघडया जंगलात. खडकाळ हलक्या प्रतीच्या जमिनीमध्ये लागवड करतात. दख्खनमध्ये विपूल.

**सर्वसाधारण वर्णन** - बोर शितल, गोड, पचनास जड, शुक्रकर, विरेचक, स्तंभक, शक्तीवर्धक, श्रमपरिहारक, पाचक, ग्राही, व्रणशोधक, रुक्ष, कडू आहे. व पित्त कफ यांचा नाश करते. चरक-सुश्रुत संहितेनुसार -हृद्य, हिक्कानिग्रहण, श्रमहर, गणांत समाविष्ठ आहे.

**गुणधर्म विशेष** - बोर शितल, गोड, पचनास जड, शुक्रकर, विरेचक, स्तंभक, शक्तीवर्धक, श्रमपरिहारक, पाचक, ग्राही, व्रणशोधक, रुक्ष, कडू आहे. व पित्त कफ यांचा नाश करते. चरक-सुश्रुत संहितेनुसार -हृद्य, हिक्कानिग्रहण, श्रमहर, गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - साल, मूळ, पाने, फळे, बी

**उपयोग** - सालीचा काढा- हगवणीवर, आमांश, अतिसारावर. मूळ- खोकला, पित्तवृध्दी. मूळाचा काढा तापावर, व्रण, जखमांवर उपयोगी, पानांचा लेप-ताप व दाह यांचा नाश करणे. लठ्ठपणा कमी करणे. कृमिनाशक आहे. फळे-शक्तीवर्धक, पाचक, शुक्रकर, आहेत. पित्तप्रकोप, जळजळ, तृषारोग, व्रांती, क्षय आणि रक्त रोगांत चांगली आहेत. बिया- स्तंभक असून हृदय आणि मेंदूस शक्तीवर्धक आहेत. तृषा भागविणारे आहेत. फळांचा मोरावळा, शरबत, सुक्या बोराची भाजी जेवणांत खाद्य म्हणून वापरतात. बोरीचे लाकूड, नांगर, शेतीचे अवजारे, बंदूकीचा दस्ते करण्यासाठी वापरतात. चारा, इंधन व कुंपणासाठी फांद्या हया झाडापासून मिळतात. बोरीच्या झाडावर उत्तम प्रकारे 'लाख' चे उत्पन्न येते.

**पुनरुत्पादन** - दुष्काळी प्रदेशांत -पडीक जमिनीवरील वरदान आहे. प्रतिकुल परिस्थितीला दाद न देणारे. वरकस- पडीक जमिनीसाठी पिक देणारे आहे. बी पेरुन कलम करावेत. डोळे भरुन कलम करावेत. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner






# ३३. महारुख

Ailanthus excelsa Roxb.

**सामान्य नावे** - महानिंब, महारुख (हिं) महावृक्ष (सं) Indian tree of Heavan, Coramandel ailanto (इं)

**कुळ (Family)** - Simaroubaceae

**अधिवास, आढळ** - मूळ भारतातील वृक्ष. बिहार, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, दक्षिण भारत. सर्व प्रकारच्या जमिनीत. मुख्यत्वे लालमातीत.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा वृक्ष. खोड- उंच सरळ. साल- ओबडधोबड करडया रंगाची जाड व रवाळ, उग्रवास. पाने -एका आड एक, २ फुटापर्यंत लांब, ८ ते १४ जोडया, भाल्यासारखी, लघुकोनी पर्णिका, कडुनिंबाच्या पर्णिकांसारखी. फुले - मोठी पांढरट पिवळी, मादी फुले व नर फुले वेगवेगळी, पानांच्या वगलेत येतात. फळे-लहान चपटया शेंगा, शेंगेला पातळ पंख. आत एकच बी.

**गुणधर्म विशेष** - साल- कडू, तुरट, दीपन, कडू पौष्टिक, ग्राही, ज्वरघ्न, भूकवर्धक, कृमिनाशक, बलवर्धक आहे. सालीला दालचिनीचा वास येतो. साल - भिजत घातली तर फुगते, चिकट होते., किळसवाणी घाण येते. पाने चुरगळल्यास भाजलेल्या शेंगा सारखा वास येतो, वास उग्र असतो.

**उपयुक्त भाग** - साल, पाने

**उपयोग** - साल- जीर्ण ज्वर, अशक्तपणा यांत बलवर्धक आहे. बाळंतिणीस शक्ती येण्यासाठी देतात. लहान मुलांच्या अतिसार, पोटदुखी, कृमी, कानदुखी अपचन यांत उपयोगी आहे. अस्थमा, दमा, वायगोळा थांबविणेसाठी देतात. पानांची खीर करुन दूधासाखर बरोबर बाळंतीणीस शक्ती येण्यासाठी देतात. लाकूड हलकेसे, नरम, ठिसूळ आहे. त्यामुळे आगकाडया, काडेपेटी करण्यासाठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - रस्त्याच्या दुतर्फा लागवडीसाठी तसेच फांदयाच्या विशिष्ट रचना व पांढुरक्या रंगामुळे पर्णान्यासमुळे शोभिवंत म्हणून उद्यानातील लागवडीस चांगला. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ३४.मोहा

Madhuca indica Gmel; Bassia latifolia Roxb.

**सामान्य नावे** - मोहवा, मोहडा (म) महुआ (हिं) मधुक (सं) Butter tree, Honey tree (इं)

**कुळ (Family)** - Sapotaceae

**अधिवास, आढळ** - शुष्क पानझडी जंगल व भरपूर सुर्यप्रकाश असलेल्या क्षेत्रात. भारतात सर्वत्र. विदर्भ, सातपुडा, कोकणातील डोंगराळ व मैदानी भागात मोठया प्रमाणात. दक्षिण भारतात याच बरोबर B. longifolia ही प्रजातीही आढळते.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा, विशाल ओबडधोबड, आखुड बुंध्याचा सदापर्णी वृक्ष. साल पिवळट, जाड, खपल्या पडतात. अल्पकाळ पानगळ होणारा वृक्ष. आंतरसाल त्यातून पांढरा चिक बाहेर पडतो. पाने-लांब, वर्तुळी, चर्मिल, फांदीच्या टोकाशी साधी, एका आड एक. फुले-पिवळसर दाट, शेंडयाला एकवटलेली गुच्छात. फुलांना मादक सुगंध. फळे-लांबट, गोल, तपकिरी, गर युक्त.

**गुणधर्म विशेष** - मोह - मधुर, शीत,कफकर, वीर्यकारक, पौष्टीक, तुरट, कडू, चरबीकारक, कामोत्तेजक, शक्तीवर्धक, पोषक, पित्त, दाह, व्रण, श्रम, कृमिरोग, वायु, अपस्मार, उन्माद, यांचा नाश करतो. सालीचा काढा स्तंभक आणि पौष्टिक आहे. बियांमध्ये-ग्लुकोसाईड, सॅपोनिन आहे. चरक-सुश्रुत संहितेनुसार मोहा संधानीय, दाह प्रशमन, पुरुष विरंजनीय गणात समाविष्ट आहे. रेवती नक्षत्राचा आराध्य तर शततारका नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - साल, लाकूड, पाने, फुले, फळे, बी

**उपयोग** - फुले मक्यापेक्षाही जास्त कार्बोहायड्रेटस, प्रथिने, मिनरल्स आणि व्हिटॅमिन असलेले उत्तम खाद्य आहे. आदिवासी भागातील पारंपारिक अन्न आहे. फुलांपासून मद्यार्क (१ टन फुलांपासून ३०० ते ३५० लिटर पर्यंत मद्यार्क निघतो.) फळांच्या गरांपासून ही मद्यार्क मिळतो. बियांपासून (२० ते ५०%) चरबीयुक्त तेल मिळते. फुलांपासून उर्ध्वपातनाने स्पिरीट मिळते. हे उष्ण, स्तंभक पौष्टीक आणि भुकवर्धक आहे. फळ - पौष्टीक आहे. तृषारोग, श्वासनलिका दाह, रक्तरोग यांत उपयोगी आहे. फळांपासून निघालेले चरबीयुक्त तेल, साबण तयार करणेत वापरतात. आदिवासी भागात मोहटी तेल खाद्य तेल म्हणूनही वापरतात. लाकूड इमारती घरे, फर्निचर साठी वापरतात. पानांचा उपयोग पत्रावळी, द्रोण तयार करणेसाठी होतो.

**पुनरुत्पादन** - कोरडया वालुका मिश्रित, नाल्या किनारी, जमिनीत उत्तम. दगड गोटयासह माती थरासह, गाळाच्या खोऱ्यात ७५० मिमी ते १८७५ मिमी. पावसाचे प्रदेशात (आर्द्रता ४० ते ९०) चांगले वाढते. (परिशिष्ट पहावीत.)









# ३५. रिठा

**Sapindus trifoliatus L.; S. laurifolius (Vahl.)**

**सामान्य नावे** - रिंगी (म) अरिठा, फेनिला (हिं) अरिष्ठक (सं) Soap nut tree (इं)

**कुळ (Family)** - Sapindaceae

**अधिवास, आढळ** - दक्षिण भारत, कोकण, पश्चिम घाटांत, प्रामुख्याने सातपुडा विदर्भातही आढळतो.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम ते मोठा आकाराचा पानझडी वृक्ष. पाने - एका प्रजातीत ३/३ तर अन्य एका आड एक. पाने पातळ, वरून चकचकीत खालून लवयुक्त मऊ. फुले - पांढरट हिरवी असंख्य टोकाला परिमंजिरी. फळे - आवळा, बोरा एवढी, मांसल, तीन खणी. पिकल्यावर मऊ व पिवळसर झांक. बी-वाटोळे काळे.

**गुणधर्म विशेष** - रिठा - तिखट, उष्ण, लेखन, गर्भपातकारक, स्निग्ध, पाककाळी तीक्ष्ण, त्रिदोष, दाह, शूल, यांचा नाश करते. फळांचा गर - उष्ण, कडू, स्निग्ध, कफघ्न, वामक आणि वातहर आहे. लेप-वेदनास्थापन व शोथघ्न आहे. फळांमध्ये १०-१२% साबण, १०% साखर व बोळा सारखा कफघ्न पदार्थ असतो. यांमध्ये "सॅपोनिन" आहे. बियांमध्ये ३०% पांढरी चरबी असते. गरम केल्यावर तेलासारखी पातळ व रंगहीन होते. साबणासाठी हे उपयुक्त आहे. चरक-सुश्रुत संहितेनुसार कफघ्न गणांमध्ये समाविष्ट आहे.

**उपयुक्त भाग** - साल, मुळ, पाने, फुले

**उपयोग** - साल, पाने, फळे - गर्भपातक कारक, कफ काढणे, विषनाशक, मोडशी, अपस्मारावर उपयुक्त आहेत. फळ - वांतीकारक, त्रिदोषांत गुणकारी, गर्भाशयासाठी शामक आहे. कफोत्सर्जक आहे. मूळ ही कफोत्सर्जक असून नेत्र रोगांत उपयुक्त आहे. कृमिनाशक आहे. फळांपासून साबण तयार करतात. कपडे स्वच्छ करतात. दागिने धुण्यासाठी रिठयाचा उपयोग करतात.

**पुनरुत्पादन** - सहसा घरांचे जवळपास रिठयाची लागवड करीत नाहीत. उद्यानांमध्ये, संमिश्र स्वरूपांत क्षेत्रामध्ये लागवड करावी. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ३६. वायावर्ण

Crataeva religiosa Frost.; C. nurula Sensa Kanj & Das

**सामान्य नावे** - वरूण (म) वरना (हिं) वरूण, अश्मरघ्नी (सं) Holy Garter Pear (इं)

**कुळ (Family)** - Capparidaceae

**अधिवास, आढळ** - ओलसर, दमट व सावलीच्या जागेत. नदी नाल्यांच्या काठावर, भारतभर कमी अधिक प्रमाणांत सर्वत्र. बंगाल, आसाम, केरळ मध्ये जास्त प्रमाणांत. वन्य स्वरूपात कोकणांत. उत्तरेत लागवड करतात. मुस्लीम समाजाच्या कबरीजवळ तसेच उद्यानात, रस्त्याच्या दुतर्फा लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम - मोठा पानझडी शोभिवंत वृक्ष. साल - राखाडी करडी, पांढरट धुसर करडी. सालीवर गोलाकार खाचा. पाने - ऋतुपर्णी, त्रिदली, लांब देठाची, चुरगळल्यास उग्रवास, फांदीच्या टोकाला एकत्रित, पानांचे झुबके. पाने गळालेली असतांना फुले येतात. फुले - पांढरट, पिवळसर, काहीसी निळसर, सुगंधी, फुलांमध्ये तांबुस पुंकेसर, वसंत ऋतुमध्ये फुले येतात. रंग बदलतात. फळे - पावसाळयात येतात. लांबुळक्या बोराएवढी पिवळसर असतात. पिकल्यावर लाल होतात. बिया अनेक.

**गुणधर्म विशेष** - वरूण - तुरट, पित्तकारक, भेदक, उष्ण, तिखट, कडू, दीपन, मधुर, स्निग्ध, कडवट, पाचक आहे. वायु, कफ, गुल्म, कृमि, अश्मरी, वातरक्त, रक्तदोष, मूत्राघात, हदयरोग व शिरोवात नाशक आहे. पित्तसारक, अनुलोमिक, मूत्रजनन व शोथघ्न आहे. झाडामध्ये Saponin आहे.

**उपयुक्त भाग** - मूळे, साल, पाने, फुले, फळे

**उपयोग** - मूळ - आरोग्य पुन:स्थापक, भुकवर्धक, पित्तरसाचा स्त्राव वाढविणारे आहे. मूत्रपिंड-मूत्राशय मूतखडयावर गुणकारी. साल- मूत्रपिंडात खडा होऊ न देणारी, शर्करा, बस्तीशूल आणि मूत्रकच्छ इत्यादी मूत्र रोगात. गंडमाला, व्रणशोथ, ज्वरभ्रम यांत उपयोगी. पानांचा फांट पोटफुगी, कुपचन, उलटी थांबविणे करता, चरबी झडणेस पानांची भाजी खातात. पाने व सालीचा काढा - चेहऱ्यावरील काळे डाग काढणेसाठी उपयुक्त. लाकूड - मऊ, पण न फाटणारे, त्यामुळे खेळणी, मॉडेल्स किंवा कोरीव खोकी बनविणसाठी उपयुक्त आहे.

**पुनरुत्पादन** - (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner



# ३७. शमी

Prosopis spicigera L.  P. cineraria L. Druce.

**सामान्य नावे** - सौदंड (म) खेजरी, (हिं) शमी (सं.) Spung, Golden tree of Indian deserts (इं)

**कुळ (Family)** - Fabaceae

**अधिवास, आढळ** - रूक्ष, उष्ण प्रदेशात. भारतात प्रामुख्याने - राजस्थान, गुजरात, मध्य व दक्षिण भारतात. गोदावरी खोऱ्यांत. महाराष्ट्रात खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भाच्या कोरडया हवामान प्रदेशात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम - मोठा काटेरी वृक्ष. जवळपास सदापर्णी वृक्ष आहे. उन्हाळयापूर्वी नवी पालवी येते. फुलांचा आकार लहान. पिवळी किंवा पांढरट पिवळी, नवीन पालवी आल्यानंतर फुले येतात. दोन महिन्यांत शेंगा परिपक्व होतात. शेंगामध्ये ४ ते ८ बिया. शेंगा मासंल, चवीने गोड. बिया - मेथीच्या बीयांसारखी, थोडी जास्त लांबट.

**गुणधर्म विशेष** - शमी-तुरट, लघु, कडू, तिखट, रेचक, रूक्ष, शितल आहे. रक्तपित्त, कृष्ठ, अर्श, दमा, खोकला, कफ, भ्रम, अतिसार, कंप यांचा नाश करते. शेंगा तिक्ष्ण, पित्तकर, मधुर, मेधाकारक, स्वादु, उष्ण असून केशनाशक आहे. शमी धनिष्ठा नक्षत्राचा आराध्य व पूर्वाषाढा नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, कोवळया तुंबऱ्या

**उपयोग** - साल - सांधेदुखी, कुष्ठ, कृमी, मूळव्याध, विषारावर स्नायु दुखीवर उपयोगी, मूळ व साल - व्रण लवकर भरून येणे, आगेपण, गरमी यावर उपयुक्त. कोवळया तुंबऱ्या - प्रमेह, धुपणी, उन्हाळा, मूत्रातून धातू अथवा खर पडत असल्यास, गर्भावर उपयुक्त. लाकूड-इमारती, घरे बांधणी, कृषी अवजारे साठी उपयुक्त, गुरांना विशेषत: शेळया मेंढयाना पाने आवडतात. दसऱ्याच्या दिवशी शमीची पूजा करतात.

**पुनरुत्पादन** - शमी अत्यंत निकृष्ठ जमिनीत १०० मि.मि. ते १५०० मि.मि. प्रदेशात कठीण खडतर वातावरणांत वाढणारा वृक्ष आहे. पाण्याच्या शोधासाठी त्याची मुळे ३५ मीटर पर्यंत खोल जातात. व्दिदल शेंग वर्गीय वनस्पती असलेने त्याच्या मुळावरील नत्रगंथी मुळे जमिनीच्या प्रतीची सुधारणा होते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ३८. शिरस

## *Albizia lebbeck* L. Benth.

**सामान्य नावे** - चिंचोला, काळा शिरस (म), भंडीर (हिं), शिरीष, कृष्ण शिरीष (सं)

**कुळ (Family)** - Mimosaceae

**अधिवास, आढळ** - कोरडी, आर्द्र , मोसमी वने. नदी नाल्यांच्या कडेला.दलदलीच्या प्रदेशात. गवताळ प्रदेशात. दमट सर्वसाधारण कोरडया हवामानांत. भारतात-महाराष्ट्रात सर्वत्र.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा घुमटी सारखा पर्णझडी वृक्ष. खोड सरळ वर पसरलेले, साल करडी, चिरा पडलेली. पाने ऋतुपर्णी, लहान, टोकाला वाटोळी, संयुक्त, एका आड एक, पर्णिका ५ जे ९ जोडया. फुले - पिवळी, केशरी रंगाची, सुवासिक फळे- वीतभर लांब शेंगा, सुरुवातीला पिवळसर, नंतर लालसर, तपकिरी, पातळ, चपटया, आंत ६ ते १२ तपकिरी रंगाच्या बिया.

**गुणधर्म विशेष** - शिरस - मधुर, शितल, कडु, तुरट, तिखट असून सूज, खोकला, विसर्प, विष, कडू, कुष्ठ, रक्तदोष, श्वासदोष यांचा नाश करतो. साल - कडू, शीतल, संसर्गरक्षक आहे. मूळ-स्तंभक आहे. चरक-सुश्रुत संहितेनुसार वेदनास्थापन व विषघ्न गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - पंचाग, साल, पानांचा-फुलांचा काढा

**उपयोग** - सालपूड - हिरडया घट्ट करणे, दात दुखी, चर्म रोग, यावर उपयोगी. कृमीनाशक, वात रक्तरोग, पांढरे डाग, खाज, त्वचारोग, मूळव्याध, दाह, श्वासनलीका दाह, यांत गुणकारी. पानांचा काढा - मेंदुला पौष्टीक, रातआंधळेपणावर उपयुक्त. फुलांचा काढा - अर्धशिषी, रेतस्तंभावर उपयोगी. तेल - कुष्ठ रोगांवर उपयोगी. मुळे - अर्धशिषीवर बिया - पुरळ, सूज, केसतुट मध्ये वापरतात. अंजन नेत्र रोगांत वापरतात.

**पुनरुत्पादन** - अधोविस्तारित मुळापासूनही पुनरुत्पत्ती होऊ शकते. शिघ्रगतीने वाढणारे झाड. (परिशिष्ट पहावीत.)





Scanned by CamScanner



# ३९. शिवण

*Gmelina arborea* L. (Roxb)

**सामान्य नावे** - गमर (हिं) गंभारी, काश्मिरी (सं) Comb Teak, Cashmere Tree, The White Teak (इं)

**कुळ (Family)** - Verbenaceae

**अधिवास, आढळ** - राज्यभर मोसमी जंगलात विखुरलेले. खानदेश, विदर्भ, कोकणातील जंगलात. खाजगी क्षेत्रातही विपूल. शेताच्या बांधावर, रस्त्याच्या कडेला लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा वृक्ष, खोड उंच. साल - पिवळट, पांढरी. पाने - हृदयाकृती, एकमेकांच्या विरुध्द, खालून लवयुक्त, वाटोळी टोकदार, मोठी. पाने फुले एकाच वेळी येतात. फुले-पिवळट रंगाची लालसर, काळी छटा असलेली, फुलांत मधासारखा चिकट पदार्थ भरपूर, फुले टोकाला येतात, बाहेरुन केसाळ. फळे-लहान जांभुळ-बोराएवढी, गोल देठाकडे निमूळती, मांसल, आंत एक बी. बीयांचे कवच कठीण असते.

**गुणधर्म विशेष** - शिवण दशमूळ (बृहतपंचक मूळ) पैकी एक आहे. शिवण - तिखट, तुरट, गोड, मधुर, दीपन, मेधाकर , भेदक असून मूळव्याध, रक्तदोष, तहान, आमशूल, कफ, सूज, दाह, ज्वर, भ्रम यांचा नाश करते. पाने-शीतल, स्नेहन. फळे - तृषाहार, दाहशमन. मुळे कटु, दीपन शीतल, उष्ण, पचनास जड, विरेचक आहेत. कृमिनाशक, भूकवर्धक आहेत. फुले स्तंभक आहेत. चरक-सुश्रुत संहितेमध्ये शोथहर, दाह प्रशमन, विरेचनोपग गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, पाने, फुले

**उपयोग** - पाने- डोकेदुखी, मूत्राशय रोग, दुध सुटणेसाठी अप्रतिम औषध आहे. मूळ खोकला, परमा, आम्लपित्त, रक्तपित्त, मूत्राघात यावर उपयुक्त आहे. मिथ्याभ्यास तहान, मूळव्याध, उदरशूल, जळजळ, ताप, त्रिदोष, मूत्रकृच्छ यांत उपयोगी आहे. फुलांपासूनचा शिवणीचा मध फारच औषधी आहे. लाकूड हलके पण फारच चिवट त्यामुळे मूर्ती घडविणे, फर्निचर यासाठी उपयुक्त आहे.

**पुनरुत्पादन** - ७५० मिमी. ते ४५०० मिमी. पाऊस, समुद्र सपाटीपासून १०० मीटर उंची पर्यंतच्या प्रदेशात चांगले येते. कमी पावसाचे प्रदेशात जगत नाही. जलद वाढणारे. याची फळे गुरांना आवडतात. गुरांनी खाऊन टाकलेल्या बियांची उगवण क्षमता चांगली. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ४०. शेवगा

## Moringa oleifera Lam

**सामान्य नावे** - शेगट (म) सहिंजना (हिं) शिग्रु (सं) Drum Stick, Ben nut, Horse Radish tree (इं)

**कुळ (Family)** - Moringaceae

**अधिवास, आढळ** - भारतात, महाराष्ट्रात सर्वत्र. दोन जाती आहेत. पैकी एक Wild - जंगलात आढळते. दुसरी Moringa Oleifera Lam ची लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मध्यम आकाराचा, ठिसूळ लाकडाचा वृक्ष, पाने संयुक्त, एका आड एक पर्णिका १ ते १.५ फूटलांब, फांद्या पोकळ. फुले-पांढरी. शेंगा १ ते २.५ फूटापर्यंत लांब, उभ्यारेषायुक्त. बिया अनेक पंखधारी.

**गुणधर्म विशेष** - शेवगां-तिखट, मधु, उष्ण, पाचक, सारक, खारट, तिक्ष्ण, रूचिकर, अग्नीदीपक, व्रणनाशक, कडू आहे. मूळ, शेंगा, पाने फुले -वात, कफ, व्रण ज्वर, कुष्ठ, गुल्म, मस्तकशूल नाशक आहेत. आतड्यांसाठी संग्राही, वेदनाशामक, भूकवर्धक आहे. कॅल्शियम व 'क' जीवनसत्व भरपूर आहे. शेंगामध्ये प्रथिने भरपूर, पानांच्या रसामध्ये अ,ब,क जीवनसत्वे आहेत. बियामध्ये ३० ते ४०% तेल आहे. ते पाण्यांत मिसळत नाही. अल्कोहोल मध्ये मिसळते. चरक-सुश्रुत संहितेनुसार कृमिघ्न, स्वेदोपग, पुतीहर, शिरोविरेचनोपग गणात समाविष्ट आहे.

**उपयुक्त भाग** - मुळांची ताजी साल, बी, शेंगा, फुले

**उपयोग** - पाने, फुले, शेंगा यांची भाजी करतात. शेंगामध्ये भरपूर प्रथिने तर पानांमध्ये 'अ' जीवनसत्व भरपूर असलेने भाज्यांबरोबर पोषक द्रव्ये पोटात जातात. पाल्याचा रस-नेत्र रोगावर, वात गुल्मावर, नळ वायुवर, वापरतात. मज्जातंतूव्यूहास आणि हृदयांस उत्तेजक आहे. लघवीचे प्रमाण व त्यातील क्षार वाढवितात. व्रणशोथ उतरवतो. लघवीतून व्रणदोष निघून जातो. ज्वरामध्ये घाम व लघवी वाढते व ज्वर उतरतो. साल उगाळून व्रणशोथ अग्नीमांद्य, कुपचन, पोटशूल, कंबरदुखीवर सालीचा किसही देतात.

**पुनरुत्पादन** - मिश्र पीक म्हणून अंत्यंत उपयुक्त, बियांबरोबरच, उत्कृष्ट प्रतीच्या झाडांच्या फांद्या पासून ही पुनरुत्पादन करता येते. सुरवातीला पाणी द्यावे सुधारित प्रजातीमध्ये ६ महिन्यानंतर शेंगा येतात. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner



# ४१. सटवीण

Alstonia scholaris (L) R.Br.

**सामान्य नावे** - सातवीण (म) सैतानवृक्ष, छातियान (हिं) सप्तपर्ण (सं) Ditta bark tree (इं)

**कुळ (Family)** - Apocynaceae

**अधिवास, आढळ** - उष्ण कटीबंधीय प्रदेश, आर्द्र जंगल. भारतात, राज्यभर मोसमी जंगलात, मैदानी क्षेत्रात. कोकण, उत्तर कर्नाटकातील वनांत. शोभिवंत झाड म्हणून उद्यानांमध्ये शहरांत- रस्ता दुतर्फा लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा सदापर्णी वृक्ष. खोड-गर्द तपकिरी, काळपट. साल पांढरट ठिपके असलेली, खडबडीत. आंतर सालीला "डिट्टा' साल म्हणतात. फांद्याची रचना खोडा भोवती साधारण वर्तुळाकार असते. पाने साधी, लांब एका डेखास ७ पाने चक्राकार पध्दतीने. पानांच्या कडेला समांतर अशी स्पष्टशीर दिसते. पाने व फांदीचा डेखा तोडलेवर चिक येतो. फुले -लहान देठावर, पुष्पसंभारात, छत्रीसारखे पसरट व गुच्छांमध्ये येतात. फुले-हिरवट पांढरी, सुवासिक, फुलांच्या देठातून स्वतंत्र टोक असलेल्या दोनशेंगा बाहेर पडतात. केसयुक्त बिया. दोन्ही टोकांना लांब तंतु चे पुंजके चिकटलेले दिसतात.

**गुणधर्म विशेष** - सातवीण दीपक, सारक, कडू, उष्ण, मदगंधी, सुगंधी, स्निग्ध, तुरट, व हृद्य आहे. रक्तदोष, व्रण, कृमि, दमा, त्रिदोष, कुष्ठ, शूल व गुल्म यांचा नाश करते. चरक-सुश्रुत संहितेनुसार कुष्ठघ्न, उदर्दप्रशमन, स्तन्यजनन गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - या झाडांची साल (Ditta Bark) महत्वाची. मूळ, पाने, दुग्धरस

**उपयोग** - सालीमध्ये डिटॉमाईन व इकायटामाईन अल्कोलॉईड्स आहेत. साल जखमा भरून येण्यास व त्वचा रोगांत साल विरेचक, स्तंभक, पौष्टीक, आवर्ती, ज्वररोधक, ज्वरनाशक आहे. कृमिनाशक, दुग्धवर्धक, हृदयरोग, दमा, रक्तविकार, अर्बुद, त्रिदोषदुखणे यावर उत्तम आहे. चिरकाली व्रण आणि दंतक्षयासाठी अत्यंत चांगले. बाळंत ज्वरावर अत्यंत उपयोगी आहे. दिर्घकाळच्या अतिसारांत, अतिसारांत रक्त पडणे, मलेरियावर उपयुक्त आहे. ज्वरानंतरच्या परिणामावर साल मौल्यवान. साल व पाने दुग्ध वाढविणे. भूक वाढविणे. बाळंत ज्वर, त्रिदोष धुपणी यावर उपयोगी आहे. दुग्धरस, व्रण, संधीवातात तसेच कान दुखण्यावर तेलांत मिसळवून लावतात.

**पुनरुत्पादन** - जलदगतीने वादणारा वृक्ष आहे. (परिशिष्ट पहावीत.)

# ४२. सावर

**Bombax malabaricum DC. B.ceiba L.**

**सामान्य नावे** - मोचरस, काटेसांवर (म) सेमल (हिं) शाल्मली (सं) Silk cotton tree semul (इं)

**कुळ (Family)** - Bombacaceae

**अधिवास, आढळ** - विशेषत: उष्ण कटीबंधातील वनात. ७५० मिली मि.ते ४५०० मिली. पावसाचे व २५ ते ४५ डिग्री सेल्सि. तापमानात, समुद्रसपाटीपासून ते ११०० मीटर उंची पर्यंत विविध प्रकारच्या हवामानांत. संपूर्ण भारताबरोबर महाराष्ट्रातही सर्वत्र.

**सर्वसाधारण वर्णन** - पानगळी प्रकारचा मोठा, सरळ सोट वाढणारा वृक्ष. झाडाचे खोड शक्यतो गोलाकार व त्रिकोणी बसके, काटे असलेले. फांद्या थोड्या अंतराने जमीनीला समांतर असतात. पाने हिवाळ्यात गळतात. नवीन पाने येण्याआधी फांद्यांच्या टोकांना लालभडक रंगाची, बाहेरच्या बाजुला केसाळ असणारी फुले येतात. फळांचे बोंड हिरवे व अड्ग्रांसारखे लांबट असते. बोंडामध्ये रेशमासारखा कापूस आणि लाल काळसर पुष्कळ बीया असतात. झाडाच्या बुंध्यापासून निघणाऱ्या डिंकाला 'मोचरस' म्हणतात.

**गुणधर्म विशेष** - सालीचा रस-ग्राहक, कफनाशक. फुले-शीतल, कडु, तुरट, वातुळ, कफपित्त, रक्तदोष नाशक. मोचरस तुरट, ग्राहक बलकर, पृष्टीकारक, धातुवर्धक, शीतल, वयस्थापक, गर्भस्थापक, वातनाशक व स्निग्ध आहे. चरक-सुश्रुत संहितेनुसार-संधानीय, पुरूष संग्रहणीय, पुरूषविरंजनीय, शोणितस्थापन, वेदनास्थापन गणांत समाविष्ट आहे. सावर जेष्ठा नक्षत्राचा आराध्यवृक्ष आणि स्वाती नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल, फुले, डिंक (मोचरस)

**उपयोग** - मूळ, साल, फुले मोचरस- हे गर्मी, थंड प्रमेह पानथरी, जीर्ण अतिसार, संग्रहणी, आव, इत्यादी व्याधी रोगांवर वापरतात. धातुपुष्ठता व कफनाशक म्हणून उपयुक्त. मोचरस जीर्ण-अतिसार. संग्रहणी आणि आंवेत चांगला उपयोगी आहे. एक वर्षाचे आतील रोपांचे मुळास ''सेमल-मुसली'' म्हणतात. ते दुधाबरोबर बलवर्धक व पौष्टीक असते. परमा व आंवेत थकवा आल्यास त्याची पेज देतात. काटे दुधात उगळून तारूण्यपिटीकेवर व त्वचेवरील काळेडाग घालविणेसाठी लावतात. स्थुलता कमी करणेसाठी काटे व आंतरसाल याचे चूर्ण घेतात. लाकूड हलके व मऊ असते. त्यामुळे पॅकिंग केसेस, काड्यापेट्या, आगकाड्या तयार करणेसाठी वापरतात. फळांमधील कापूस उशा (cushion) साठी वापरतात.

**पुनरुत्पादन** - हलक्या कापसामुळे बिया लांबवर वाऱ्याबरोबर उडत जाऊन पसरतात. त्यामुळे बियापांसून नैसर्गिक पुनरूत्पादन चांगले आढळते. सावर वृक्ष जलदगतीने वाढणारा वृक्ष आहे. (परिशिष्ट पहावीत.)













# ४३. सोनचाफा

Michelia champaca Linn.

**सामान्य नावे** - पिवळा चाफा (म.) चंपा, (हिं.) चम्पका, सुवर्ण चंपक, (सं.) Golden Champa , Champaca (इं.)

**कुळ (Family)** - Magnoliaceae

**अधिवास, आढळ** - सदाहरित पावसाळी जंगलात. प.घाट, द.भारत, महाराष्ट्रांत दक्षिण कोंकण देवळाजवळ, उद्यांनामध्ये लागवड करतात.

**सर्वसाधारण वर्णन** - मोठा वृक्ष. खोड ९-१० मीटर लांब. साल-जाड भुरकट पांढरी. पाने- सदापर्णी लांब, टोकदार कडा नागमोडी, गुळगुळीत. फुले-पिवळी, सुवासिक, लहान, आखूड, देठ जाड. फळे- घडामध्ये घट्ट, एकदली. करडे बी.

**गुणधर्म विशेष** - साल-कडू, तुरट, विषनाशक, मूत्रवर्धक, स्वेदकारी, ज्वरघ्न, कामोत्तेजक आहे. फुले-दीपक व मूत्रवर्धक, कफोत्सर्जक , सुगंधी उत्तेजक आहे. फुलांमध्ये essential oil तर बियांमध्ये Fatty oil आहे. सोनचाफा आश्लेषानक्षत्राचा आराध्य वृक्ष तर आर्द्रा नक्षत्राचा क्षेमकर वृक्ष आहे. चरक सुश्रुत संहितेनुसार दीपन, पाचन, स्नेहन गणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - मूळ, साल पाने फुले, फळे

**उपयोग** - साल-कृमि, कफवात, पित्त, आणि अशुध्द रक्त यांत गुणकारी सुवासिक, ज्वरनाशक, उत्तेजक आहे. सालीचा काढा मासिक पाळी सुधारण्याकरिता उपयोगी आहे. पाने-दुसऱ्या औषधांबरोबर योनी स्त्रावाची दुर्गंधी दूर करण्यासाठी, पानांचा रस कृमि उत्सर्जनाचे काम करतो. फुले-पित्त प्रकोप, कुष्ठरोग, त्वचारोग, व्रण, खोकला, संधीवात, डोकेदुखी, भोवळ यांत उपयोगी. फुले तेलात कुटून संधीवात, भोवळ यावर उपयोगी. फुलांचा फांट- उन्हाळा कमी करणेसाठी, पाणी पिण्यामुळे लघवीचा त्रास होत असेल तर देतात. बियांचे तेल- उदरवायुपासून आराम मिळणे साठी देतात.

**पुनरुत्पादन** - सुधारित प्रजातीमध्ये ३/४ वर्षांनी भरपूर फुले उन्हाळ्यांत व पावसाळ्यांत येतात. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

# ४४. हिरडा

Terminalia chebula Retz & Wild

* नास्ती यस्य गृहे माता,तस्य माता हरीतकी (माता नसलेल्या बालकांची माता.)*

**सामान्य नावे** - हरडा (म.) हुर्रा (हि) हरीतकी, अभया (सं) Chebulic myrobalan, myrobalan (इं)

**कुळ (Family)** - Combretaceae

**अधिवास, आढळ** - समुद्र सपाटी पासूनच्या २ हजार मीटर पर्यंतच्या उंचीच्या-मोसमी जंगलात, ओलसर भागात उत्तमप्रकारे. भारतात सर्वत्र, पश्चिम घाटांत विपूल प्रमाणांत.

**सर्वसाधारण वर्णन** - झुपकेदार पसरट व अनेक वर्ष टिकणारे झाड. साल-करडी व भरपूर चिरा असलेली. पाने-टोकाशी एकवटलेली असतात. कोवळ्या पानावर केस/लव असते. फुले-पांढरी-पिवळसर, लहान लहान तुरे, नवीन फुलांना कांहीसा सुवास असतो तर जुनी फुले उग्र वास देतात फळे-पंचधारी, लंब वर्तुळाकार, फळात १ बी. कोवळ्या फळांचा रंग हिरवा, पिकल्यावर पिवळसर धुसर.

**गुणधर्म विशेष** - हिरड्यामध्ये टॅनिन, चेबुलिनिक ॲसिड, रेझिन्स असतात. गर-मधुर, आम्ल साल-तिखट, कटू. देठ-कडू. फळ-कषाय-तुरट असते. कृमिनाशक, गर्भ स्थापन, खोकल्याचा त्रास कमी करणारे आहे. प्रजास्थापनं, ज्वरघ्न, कासघ्न, अर्शोघ्न, प्रजास्थापन, वयस्थापन या गणांत चरक सुश्रुतांनी समावेश केलेला आहे.

**उपयुक्त भाग** - साल, फळ, सुकलेल्या फळाची त्वचा

**उपयोग** - हिरड्याचे ३ प्रकार आहेत. आठळी तयार होण्यापूर्वीच झाडावरून गळून पडलेला किंवा तोडून वाळविलेले बारीक फळ म्हणजे बाळहिरडा. याचा औषधी उपयोग करतात. अपरिपक्व फळ म्हणजे कातडी कमावण्यासाठी येणारे फळ. या फळापासून उत्तम प्रकारचा काळा व पिवळसर रंग तयार होतो. म्हणून त्याला रंगारी हिरडा म्हणतात. पूर्ण पिकलेले फळ औषधात वापरतात. याला सुरवारी हिरडा म्हणतात. हा महत्त्वाचा आहे. साल व फळापासून टॅनिन मोठ्या प्रमाणावर मिळते. कातडी कमावण्यासाठी त्याचा उपयोग होतो. हिरड्याचा उपयोग वातवाहिन्या व मेंदुच्या विकारावर करतात. हिरडा बुध्दीवर्धक भुकवर्धक, कफदोष नाशक, गर्भाशय शोधक आहे. डोळ्यांना हितकारक आहे. अन्न पचन करणारा, यकृत विकार नष्ट करणारा, ह्दयाला हितकारक. त्वचारोग निवारक, बुध्दकोष्ठता निवारणारा लघवी व लघवीच्या मार्गावरील दोष दुर करणारा. शुक्र धातुची निर्मिती करणारा त्याचं प्रमाणे वाढविणारा आहे. हिरडा त्रिदोष नाशक आहे. फळाचे वस्त्रगाळ चूर्ण दंतक्षय व हिरड्याच्या रक्तस्त्रावात वापरतात. जखमेवर भाजलेल्या ठिकाणी हिरड्याचे मलम लावतात. हिरड्याचे लाकूड अत्यंत घट्ट व कठीण असते. इमारती लाकूड म्हणून त्याचा चांगला उपयोग होतो.

**पुनरुत्पादन** - हिरडा सुरवातीला हळूवार वाढणारा वृक्ष आहे. (परिशिष्ट पहावीत.)







Scanned by CamScanner





# ४५. हिंगणबेट

Balanites aegyptica L, Delite, B. roxburghil Planch.

**सामान्य नावे** - हिंगणी (म) हिंगोट, हिंगोल (हिं) इंगुदी (सं) Desert date, tree, Egyptian balsam (इं)

**कुळ (Family)** - Balanitaceae

**अधिवास, आढळ** - कमी पावसाचे प्रदेशांत. खानदेश, विदर्भ, मराठवाडा, प.महाराष्ट्र, गुजरात प्रांतात आढळतो.

**सर्वसाधारण वर्णन** - काटेरी लहान वृक्ष. फांद्या-पिवळसर हिरव्या. साल-भुरकट भंगूर. २ ते ४ सेमी. लांबीचे तीक्ष्ण काटे. पाने संयुक्त, थंडीत गळतात. फुले हिरवट पांढरी, ५ पाकळ्या, मंदवास. फळे-अंड्या एवढी, लांबट गोल, त्यावर उभ्या उथळ खाची प्रारंभी हिरवी, पिकलेवर भुरकट -पांढरट पिवळी. गर-हिरवट साबणासारखा. एक बी.

**गुणधर्म विशेष** - हिंगणी -मदगंधी, तिखट, लघु, कडू, उष्ण, फेनिल आहे व कृमि, वायू, विष, शूल, व्रण, कफ यांचा नाश करते. फुले मधुर, स्निग्ध, उष्ण, कडू. बियांच्या तेलामध्ये ५४ टक्के रवेदार व चरबट आम्ल द्रव्य असते. फळातील गर हा साबण, आम्लद्रव्य, साखर, व बोळ युक्त आहे. सालीमध्येही साबणासारखा पदार्थ असतो. साल-स्त्रंसन, कृमिघ्न, कफघ्न, कुष्ठघ्न. गर-कफघ्न व स्त्रंसन आहे. सुश्रुत संहितेनुसार हिंगणी अर्कादिगणांत समाविष्ठ आहे.

**उपयुक्त भाग** - पाने, साल, बी

**उपयोग** - गर-जीर्ण कफ रोगात. कफ पातळ होऊन पाडते. लघवीस व शौचास साफ होते व थकवा येत नाही. नवीन श्वास नलीका शोथात देतात. जास्त मात्रेत जुलाब होतात. जलोदर मध्येही वापरतात (पण जुलाबासाठी वापरू नये.) तेल जखमेवर, त्वचारोगांवर अग्नीदग्ध व्रणावर लावतात. साल-मासे मारण्याकरिता वापरतात. फळांचा पल्प रेशीम साफ करणेसाठी वापरतात. गुरांच्या जखमेवरील कीडमारणेसाठी फळांचा उपयोग होते.

**पुनरुत्पादन** - कमी पावसाचे प्रदेशांत सहज वाढतो. नैसर्गिक रित्याही भरपूर वाढतो. लागवड करणेसाठी फायदेशीर नाही. मात्र कमी पावसाचे प्रदेशात उघड्या बोडक्या क्षेत्रात लागवडीसाठी चांगला. अशा क्षेत्रात रस्त्याचे दुतर्फा लागवड करणेसाठी चांगला वृक्ष आहे. सावली -छायेखाली सुरवातीला चांगली वाढ होते. (परिशिष्ट पहावीत.)



Scanned by CamScanner

« परिशिष्ट क्र.१ «

## *औषधी वृक्ष बियाणे गोळा करणे त्यांचेवर प्रक्रिया करणे, लागवड करणेसाठी पूरक माहिती.*

| अ.क्र. | प्रजातीचे नाव | फुलांचा कालावधी महिना | फळांचा कालावधी महिना | बी गोळा करण्याचा कालावधी महिना | बियाणे टिकण्याची क्षमता | बियाणांवर करावयाची प्रक्रिया | लागवडी वेळी रोपांचे वय महिने | लागवड रोप-ओळीमधील अंतर मीटर | शेरा = बागांमध्ये, उद्यानांमध्ये, रस्त्याचे-कडेला ओळीत लागवड मीटर अंतरावर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | अर्जुन | ०४ ते ०५ | ११ ते १२ | १२ ते ०१ | ६ महिने | फळे शेणमिश्रित पाण्यांत २ दिवस व नंतर ओल्या गोणपाटांत २ दिवस दडपून ठेवावी | १२ ते १८म. | ०८x०८ | संमिश्र रोपवनांत ८ मी x ८ मी., नदी काठी ५ मी. |
| २ | अशोक | ०१ ते ०३ | ०६ ते ०८ | ०६ ते ०७ | अत्यंत कमी | गोळा केलेले बी ८ - १० दिवसांचे आत पेरावे | १२ म. | ०४x०४ | ४ मीटर अंतरावर |
| ३ | आवळा | ०३ ते ०४ | १० ते ११ | १० ते ११ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १८म. | ०४x०४ | चांगल्या उत्पादना करीता सुधारीत कलमी रोपे लावावी |
| ४ | आंबा | ०१ ते ०३ | ०४ ते ०७ | ०५ ते ०६ | अत्यंत कमी | गोळा केलेली कोय १५ दिवसांचे आत पेरावी | १२ म. | ०६x०६ | चांगल्या उत्पादना करीता सुधारीत कलमी रोपे लावावी |
| ५ | कडूनिंब | ०३ ते ०५ | ०६ ते ०८ | ०६ ते ०७ | अत्यंत कमी | गोळा केलेली बी ८ दिवसांचे आत पेरावी | १२ म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ६ | कदंब | ०५ ते ०७ | ०८ ते १० | ०८ ते ०९ | अत्यंत कमी | गोळा केलेली बी १५ दिवसांचे आत पेरावी | १० ते १२म. | ०६x०६ | ४ मीटर अंतरावर |
| ७ | कवठ | ०२ ते ०५ | १० ते १ | ११ ते ०१ | १ महिने | गोळा केलेली बी ३० दिवसांचे आत पेरावी | १२ ते १८म. | ०५x०५ | ४ मीटर अंतरावर |
| ८ | करंज | ०४ ते ०६ | ०३ ते ०७ | ०४ ते ०५ | १ महिने | गोळा केलेली बी ३० दिवसांचे आत पेरावी | १२ ते १५म. | ०४x०४ | ४ मीटर अंतरावर |
| ९ | काजू | ०१ ते ०३ | ०३ ते ०५ | ०४ ते ०५ | ६ ते १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १५म. | ०४x०४ | चांगल्या उत्पादना करीता सुधारीत कलमी रोपे लावावी |
| १० | कांचनार | ११ ते ०१ | ०२ ते ०४ | ०२ ते ०३ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १५म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ११ | कांडोळ | १२ ते ०२ | ०३ ते ०५ | ०४ ते ०५ | २ ते ३ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १८म. | ०६x०६ | ४ मीटर अंतरावर |
| १२ | कुचला | ०१ ते ०३ | ०६ ते ०७ | ०६ ते ०७ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ म. | ०६x०६ | संमिश्र रोपवनांत, दमट जागी |
| १३ | कुंभा | ०२ ते ०४ | ०६ ते ०७ | ०६ ते ०७ | अत्यंत कमी | फळ गोळा केलेवर लवकर पेरावे | १२ म. | ०६x०६ | संमिश्र रोपवनांत, दमट जागी |
| १४ | कोकम | १२ ते ०२ | ०६ ते ०७ | ०५ ते ०६ | अत्यंत कमी | बी गोळा केलेवर लवकर पेरावे | १२ म. | ०४x०४ | एका ओळीने ३ मीटर वर |
| १५ | खैर | ०८ ते १० | ११ ते ०१ | १२ ते ०१ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ तास भिजवावे | ६ ते ९ म. | ०३x०३ | संमिश्र रोपवनांत, ही योग्य प्रजाती |
| १६ | चंदन | ०३ ते ०४ | ११ ते ०१ | ११ ते १२ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १८म. | ०४x०४ | उद्यानांत ३ मी. अंतरावर |
| १७ | चिंच | ०५ ते ०६ | ०३ ते ०५ | ०३ ते ०४ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १५म. | ०६x०६ | ४ मीटर अंतरावर |
| १८ | जांभुळ | ०३ ते ०४ | ०६ ते ०७ | ०६ ते ०७ | अत्यंत कमी | फळ पक्व झाल्यावर ७ ते ८ दिवसांत पेरावे | १२ म. | ०६x०६ | ४ मीटर अंतरावर |
| १९ | टेंटू | ०५ ते ०७ | ११ ते ०१ | १२ ते ०१ | ६ महिने | एका शेंगेत २०० पर्यंत पंखधारी बिया असतात. | १२ ते १८म. | ०३x०३ | संमिश्र रोपवनांत लागवड करावी. |
| २० | डिकेमली | ०४ ते ०७ | ०४ ते ०६ | ०४ ते ०५ | अत्यंत कमी | पक्व फळातील बी काढून लवकर पेरावे | १२ ते १५म. | ०४x०४ | बाग, उद्यानामध्ये ३ मीटर अंतरावर |

टीप - स्तंभ क्र. ३, ४ व ५ मधील दिलेला कालवधी हा - जानेवारी ते डिसेंबर हे महिने अनुक्रमे १ ते १२ या प्रमाणे मोजवेत.



| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | पळस | ०१ ते ०३ | ०६ ते ०७ | ०६ ते ०७ | अत्यंत कमी | शेंगा २४ तास पाण्यांत भिजवून बी काढून लवकर पेरावे | १२ ते १५म. | ०३x०३ | ३ मीटर अंतरावर |
| २२ | पाडळ | ०३ ते ०४ | ११ ते ०१ | १२ ते ०१ | १ वर्ष | शेंगामध्ये पंखधारी बिया असतात. लवकर पेराव्या | १२ ते १८म. | ०५x०५ | ४ मीटर अंतरावर |
| २३ | पांगारा | ०२ ते ०४ | ०४ ते ०६ | ०४ ते ०५ | ९ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ म. | ०३x०३ | पानवेली, मिरीवेल इ. ना आधार देणेसाठी १ मी x २मी |
| २४ | फणस | ०१ ते ०३ | ०३ ते ०५ | ०४ ते ०५ | अत्यंत कमी | फळांपासून बी काढलेवर ५ दिवसाचे आत पेरावे | १२ म. | ०६x०६ | ४ मीटर अंतरावर |
| २५ | बकनीम | ०३ ते ०५ | ११ ते ०१ | ११ ते १२ | ६ महिने | फळे रात्रभर गरम केलेल्या पाण्यांत भिजवावी | १२ ते १८म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| २६ | बकुळ | ०४ ते ०६ | ०१ ते ०३ | ०२ ते ०३ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १८म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| २७ | बहावा | ०३ ते ०५ | १२ ते ०४ | १२ ते ०१ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ ते १८म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| २८ | बाभुळ | ०८ ते १२ | ०१ ते ०३ | ०१ ते ०२ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे, शेळया मेंढयांनी शेंगा खाऊन टाकलेले बी उत्तम | १२ ते १८म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| २९ | बिब्बा | ०६ ते ०७ | ०१ ते ०३ | १२ ते ०१ | १२ महिने | ताज्या शेणांत ३/४ दिवस बुडवून ठेवावा. | १२ ते १८म. | ०६x०६ | ४ मीटर अंतरावर |
| ३० | बेल | ०३ ते ०४ | ०३ ते ०५ | ०४ ते ०५ | ६ महिने | रात्रभर कोमट पाण्यात भिजवावे | १२ ते १५म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ३१ | बेहडा | ०२ ते ०५ | १० ते १२ | ११ ते १२ | ६ महिने | फळे लाकडाच्या चोपणीने हलक्या हाताने ठोकून घ्यावे. गुरांनी फळे खाऊन टाकलेले बी उत्तम. | १२ ते १८म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ३२ | बोर | ०९ ते ११ | ११ ते ०२ | १२ ते ०१ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत २४ ते ४८ तास भिजवावे | १२ ते १८म. | ०३x०३ | २ मीटर अंतरावर |
| ३३ | महारूख | ०२ ते ०३ | ०५ ते ०६ | ०५ ते ०६ | ६ महिने | शेंगा चुरगळून 'टिकली' पेरावी | १२ म. | ०४x०४ | ४ मीटर अंतरावर |
| ३४ | मोहा | ०३ ते ०४ | ०६ ते ०७ | ०६ ते ०७ | अत्यंत कमी | ७ दिवसाचे आत पेरावे | १२ ते १८म. | ०४x०४ | ५ मीटर अंतरावर |
| ३५ | रिठा | १० ते १२ | ०२ ते ०४ | ०२ ते ०४ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत २४ ते ३६ तास भिजवावे | १२ ते १५म. | ०५x०५ | ४ मीटर अंतरावर |
| ३६ | वायावर्ण | ०३ ते ०५ | ०७ ते ०८ | ०७ ते ०८ | ३ महिने | फळातून बी बाहेर काढून ताजे बी पिशवीत पेरावे | १२ म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ३७ | शमी | ०१ ते ०३ | ०५ ते ०६ | ०५ ते ०६ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | १२ म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ३८ | शिरस | ०३ ते ०५ | ११ ते ०२ | १२ ते ०१ | ६ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे | ११ ते १५म. | ०४x०४ | ४ मीटर अंतरावर |
| ३९ | शिवण | ०२ ते ०३ | ०५ ते ०६ | ०५ ते ०६ | १२ महिने | गरम केलेल्या पाण्यांत १२ ते २४ तास भिजवावे गुरांनी खाऊन टाकलेले बी उत्तम | १२ म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ४० | शेवगा | ०१ ते ०४ | ०३ ते ०७ | ०४ ते ०५ | कमी | बी शेंगातून बाहेर काढलेवर लवकर पेरावे. | १२ म. | ०३x०३ | २ मीटर अंतरावर |
| ४१ | सटवीण | ११ ते ०१ | ०५ ते ०७ | ०५ ते ०६ | कमी | ताजे बी पिशवीत पेरावे | १२ म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ४२ | सावर | ०१ ते ०३ | ०४ ते ०५ | ०४ ते ०५ | ६ महिने | कोमट पाण्यात ६ ते १२ तास भिजवावे | १२ म. | ०४x०४ | ३ मीटर अंतरावर |
| ४३ | सोनचाफा | ०४ ते ०६ | ०९ ते १० | ०९ ते १० | कमी | ताजे बी पिशवीत पेरावे | १२ ते १८म. | ०४x०४ | सुधारित प्रजाती लावावी. |
| ४४ | हिरडा | ०५ ते ०६ | १२ ते ०२ | १२ ते ०१ | १२ महिने | हलक्या लाकडी चोपणीने हळुवार हाताने फळे ठोकून काढावी. गरम पाण्यात २४ तास भिजवावे. | १२ ते १८म. | ०४x०४ | रस्ता दुतर्फा ४ मीटर |
| ४५ | हिंगणबेट | ०३ ते ०५ | १० ते ०१ | ११ ते १२ | — | १२ ते २४ तास पाण्यांत भिजवावे | १२ ते १८म. | ०३x०३ | रस्ता दुतर्फा ३ मीटर |

टीप - स्तंभ क्र. ३, ४ व ५ मधील दिलेला कालवधी हा - जानेवारी ते डिसेंबर हे महिने अनुक्रमे १ ते १२ या प्रमाणे मोजवेत.



Scanned by CamScanner

परिशिष्ट क्र.२

## * रोपे तयार करणे व लागवड करणेसाठी घ्यावयाची काळजी. *

**पॉलीपिशव्यांची निवड** - रोपे तयार करण्यासाठी पॉली पिशव्यांची आवश्यकता असते. ९ महिने व १८ महिने कालीवधीची रोपे तयार करणेसाठी अनुक्रमे १२.५ सेमी × २५ सेमी × २०० गेज व २५ सेमी × ४० सेमी × ६०० गेज च्या पिशव्यांची निवड करावी. प्रती किलो अनुक्रमे ३२५ व ३५ नग असे त्याचे प्रमाण आहे.

**पिशव्यांमध्ये भरावयाचे मिश्रण** - पोयटयाची (नदीकाठाची) माती, कंपोष्टखत व अत्यंत बारीक वाळू हे अनुक्रमे २:१:१ हया प्रमाणांत घ्यावे.कीड नाशीसाठी शक्य असल्यास राख व १००० पिशव्यांसाठी १० किलो नीम केक, सच्छिद्रपणासाठी बारीक केलेला पालापाचोळा या सर्वांचे एकजीव मिश्रण चाळणीवर चाळून पिशव्या भराव्यात.

**बियाणाची निवड; बी पेरणे; पाणी देणे व संरक्षण** - पाण्यापेक्षा वजनाने जड असलेले बियाणे पाण्यांत टाकावे. बी पाण्यांत बुडुन तळाशी गेलेले बियाणे निवडावे. तरंगणारे टाळावे. पाण्यापेक्षा वजनाने हलके असलेले बियाणे साफ करुन वजनाने निकोप बियाणे वाऱ्यावर उफणवून /उडवून निवडावे. प्रजातीनुरुप बियाणावर प्रक्रिया करावी (सोबत तक्ता जोडला आहे) बियाणास जंतुनाशके चोपडून प्रक्रिया केलेले बी पिशवीत पेरावे. बियाणाच्या आकारमाना एवढेच खोल मातीत बी पेरावे. व त्यावर त्याच प्रमाणात माती ढकलावी. ओट्यावर तयार केलेली रोपे पिशवीत (Transplant) करण्यासाठी शक्यतो सकाळी लवकर व सायंकाळी उशीराची वेळ निवडावी. रोपे तयार करण्यासाठी अद्ययावत प्रगत तंत्रज्ञान वापरणेवर भर द्यावा. त्यामुळे वेळेची, खर्चाची बचत होऊन निकोप रोपे मिळू शकतात. रोपांना झारीने शक्यतो सकाळी व संध्याकाळी पाणी द्यावे. किडनाशासाठी रोपांवर देशी गाईचे सकाळचे ताजे १ लिटर गोमूत्र १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. गुरांपासून व अन्य प्राण्यांपासून रोपवाटीकेतील रोपांचे संरक्षण करणे अनिवार्य आहे.

**खड्डे खोदणे-भरणे** - ४५ सेमी × ४५ सेमी × ४५ सेमी आकाराचे खड्डे मार्चपूर्वी खोदावे. त्यामुळे सुर्यप्रकाश व उष्णतेमुळे माती तापून त्यातील बुरशी, कीड, नष्ट होईल. माती निर्जंतुक होऊन ढेकळे फुटतील. खोदलेल्या मातीतील सर्व दगडगोटे बाहेर काढून आवश्यकतेनुसार बाहेरची चांगली माती, कंपोष्ट खत, बारीक पालापाचोळा, नीमकेक व सुमारे १०० ग्रॅम रा. खत (NPK, DAP, SSP) यासह खड्डे पावसाळयापूर्वी पूर्ण भरावेत.

**रोपांची निवड** - उंचीने मोठी असलेली परंतु सडपातळ खोड असलेल्या रोपांपेक्षा, खोडाची जाडी जास्त असलेली सरळ, काटक, टणक खोडांची रोपे (ती उंचीने कमी असली तरी) तसेच गर्द हिरवी पाने खोडाच्या सर्व बाजूंनी पसरलेली अशी रोपे निवडावी. रोपांवर कसलीही कीड, आळी, बुरशीचा प्रादुर्भाव नसावा. रोपे शेंडाभर किंवा शेंडामोड झालेली नसावी. पिशवीतील रोपांचे मुळाची वाढ पिशवीच्या सर्व दिशांनी समान पसरलेली असावी व रोपांपासून पिशवी बाहेर काढलेवर सुध्दा मातीला घट्ट धरुन ठेवलेली असावीत.

**लागवड** -पावसाळा सुरु झालेवर जमिनीवर पुरेशी ओल झालेनंतर जुन-जुलै महिन्यांत खोदून भरलेल्या खडयातील पिशवीच्या आकाराएवढी माती बाहेर काढून पॉलीपिशवी फाडून अलगद बाजूला केलेवर मातीच्या अखंड गठ्ठयांसह रोपाची लागवड करावी. मातीचा भराव देऊन पायाने रोपासभोवारची माती दाबावी. आवश्यकते नुसार भर द्यावा. ऑक्टोबर नोव्हेंबर पर्यंत रोपा सभोवारचे तण काढणे, रोपाला भर देणे, माती ढिली करणे, मशागत करणे, सुमारे १००ग्रॅम खताचा डोस देऊन किटक नाशकाची फवारणी इ.कामे पूर्ण करावी. सोय व उपलब्धतेनुसार डिसेंबर ते मार्च रोपांना महिन्यातून दोन वेळा व एप्रिल ते जुन मध्ये महिन्यातून ३-४ वेळा पाणी द्यावे. प्रत्येक वेळा रोपाला २० ते २५ लिटर पाणी द्यावे. शक्य असल्यास ठिबक सिंचन करावे. आगीपासून संरक्षण करणेकामी क्षेत्रासभोवार आग प्रतिबंधक जाळरेषा घ्यावी व गुरांपासून रोपांचे संरक्षण करावे.



परिशिष्ट क्र.३

## * गुणधर्मांचा सोपा अर्थ *

| | | |
|---|---|---|
| अनुलोमिक | Laxative | विष्ठा आणि वात यांच्या स्वाभाविक प्रवृत्तीस उत्तेजक, मल नरम होऊन शौचास साफ करणारी |
| अर्बुद | Cancer | कर्करोग |
| अवसादक | Sedative | वेदना, क्षोभ, क्षुब्धभावना, उत्तेजना, चीड कमी करणारा, गर्भगळीत होऊ न देणारी |
| अश्मरीनाशक | Antilithics | मूत्राशयातील खडे-मूतखडा नष्ट करणे, होऊ न देणारी |
| अर्श | Piles | मूळव्याध |
| आर्तवजनन | Emmenagogues | आर्तव (विटाळ) स्त्राव वाढविणे. बंद पडलेला आर्तव दूर करणारी |
| उत्तेजक | Stimulants | उत्तेजना देणारी |
| कफघ्न | Expectorants | कफनाशक, Antiasthematics - दमा, खोकला, श्वासोच्छ्वास संबंधी Behics कफ पातळ करणारी |
| कुष्ठघ्न, त्वग्दोषनाशक | Antiparasitics | चर्मरोग जंतुजन्य रोग बरे करणारी |
| कैफी | Narcotics | मादक, कैफ आणणारे, झोप, धुंदी आणणारी |
| कंडूघ्न | Rubefacient | कंड, खाज नाशक, शोणितो क्लेशक |
| कृमिघ्न | Anthelminitics | आतडयातील कृमी मारणारा किंवा बाहेर पडण्यासाठी मदत करणारी |
| कृमिनाशक | vermifuge | कृमी,जंत मारणारी |
| गर्भपातन | Abortificient | गर्भ पाडणेस मदत करणारी |
| ग्राही | — | अन्नातील पातळ द्रव्य घट्ट करणारी, शुष्क करणारी, |
| जीवनीय | Life Promoter | शरीरांतर्गत उत्साह, आनंद उल्हास वाढवून मनाच्याद्वारे अंत:शक्तीला उत्तेजन देणारी |
| जंतनाशक | Antisolic | जंतु मारणारी |
| जंतुघ्न | Antiseptics | जंतु कीड मारक |
| ज्वरघ्न | Antipyretics, Febrifuge | ज्वर, ताप नाहीसा करणारी |
| छर्दिनिग्रहण | Anti emetic | वमन प्रतिबंधक |
| छिक्काजनन | Sternutatories | औषधे हुंगली असता शिंका आणणारी, शिंकाजनन |
| दाहशमन | Refrigerants | थंडाई निर्माण करणारी,दाह शमन करणारी ज्वरातील उष्णता कमी करणारी |
| दीपन | Stomachis | आमाशयाचे रक्त वाढवितात हयाने भूक लागते. अग्नी प्रदीप्त करणारी पाचक |
| पित्तघ्न | Antibilious | पित्तशामक, पित्त पाडणारी |
| पित्त विरेचन | Chologogues purgative | पित्त साफ करणे, पित्तापासून कोठा साफ करणारे |
| पित्तसारक | Chologogues | यकृतास उत्तेजन देऊन पित्ताचा स्त्राव वाढविणारी |
| पूतीहर | Suppurative | पू काढून टाकणारी |
| पौष्टीक, बल्य | Tonics & Stimulants | शक्तीवर्धक, उत्साह देणारी, उत्तेजक |
| बाजीकर,वृष्य | Aphordisiac | शक्तीयुक्त, थकवा न आणणारी, संभोग ईच्छा उत्पन्न करणारी, वीर्यपात लांबविणारी |
| बृहण | Fattening agents | मासं वाढविणारी, स्थूलपणा वाढविणारी |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| भेदन | Drastic purgative | जोराने मळ बाहेर काढणारी, मुरडा येऊन पातळी शौचास करणारी |
| मार्दवकर | Emollients | खाज, कंड कमी करुन त्वचा मुलयम ठेवणारी |
| मूत्रजनन-मूत्रल | Diuretic | जास्त मूत्र निर्माण करणारा, मूत्रपिंडास उत्तेजक |
| मूत्रविरंजनीय | Refrigerant diuretics | मूत्रपिंडास धुवून काढणारी |
| मूत्रविरेचनीय | Hydragogue diuretics | मूत्रपिंडातील रक्ताची आवक आणि दाब वाढविणारी, मूत्र जोराने उत्पन्न करणारी |
| मूत्रसंग्रहणीय | Urine diminishes | लघवी कमी करणारी |
| मेहनाशक | Anti diabetics | मधूमेह प्रतिकारक |
| रक्तकंदन | Styptics | रक्तस्राव थांबविणारा, रक्त गोठविणारा |
| रक्त पित्तप्रशमन | Anti scorbatic | 'क' जीवनसत्वा अभावी, स्कर्व्ही सारखे दाढेतून दांतातून रक्त वाहणे बंद करणारी |
| रेचक-रेचन | Purgative | जुलाब, कोठा साफ करणारी. |
| लेखन | — | जास्त मांस झरवणारी |
| वमन, वामक | emetic | उलटी आणणारी, पोटातील द्रव्य बाहेर फेकण्यास मदत करणारी |
| वाजीकर | Aphrodisiacs | जननेंद्रियाची शक्ती व संभोगाची इच्छा वाढविणारी |
| विरेचक विरेचन | Hydrogogue | पाण्यासारखे जुलाब होणे. आतडयांत पुष्कळ द्रव्य उत्पन्न होणे. |
| वयस्थापन | Youth preservers, Youth restores | म्हातारपण दिसू न देणारी |
| विषघ्न | Alexipharmics, Alxiterics | विष उतारा |
| वेदना स्थापन | Anodynes | वेदनांपासून मुक्ती देणारा |
| व्रणरोपक | — | व्रण (छोटया जखमा) भरुन काढणारी |
| व्रण शोधक | — | जखमेतील पू वगैरे साफ करुन व्रण शुध्द ठेवणारी |
| शिरोविरेचन | Errhines | नाकातील श्लेष्मा वाढविणारी, त्यानी शिंका येत नाही |
| शोणित स्थापन | Haematics – Blood Tonics | रक्ताची लाली, रक्त वाढविणारी |
| शोथ | Congestion | सूज कमी करणारी |
| शोथघ्न | Antiphlogestic | व्रणशोथ प्रतिकारक, सूज कमी करुन उब आणणारी, शेक देणारी |
| शोषघ्न | Antitubercular | क्षय रोग नाहीसा करणारी |
| संग्राहक | Antidiarrhoeics antidysentric | आतडयातील स्राव कमी करुन त्यास घट्ट करणारा; मळ घट्ट करणारी |
| संधानीय | Union Promoters | मोडलेले हाड - अस्थी सांधणारी |
| स्तन्यजनन | Galactogogues | दूध वाढविणारी |
| स्तंभन | Astrigents | आंतडयातील पातळ द्रव्ये व स्राव रोखणारी |
| स्वेदन | Diaphoretics | घाम वाढविणारी, घाम काढणारी |
| स्वेदापनयन | — | पुष्कळ येणारा घाम बंद करणारी |
| स्नेहन | Dimulecents | तेल, चिकटपणामुळे कातडी मऊ मुलयम ठेवणारी |
| स्त्रसंन | mild purgative | आंतडयातील चलन वलन क्रिया वाढवून ग्रंथीस उत्तेजना देणारी |



# संदर्भ-सूची


| | |
|---|---|
| १. केंद्रीय आयुर्वेद एवं सिध्द अनुसंधान परिषद | 'आयुष' विभाग, आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय भारत सरकार यांची औषधी वनस्पती प्रकाशने. |
| २. महाराष्ट्र राज्य दर्शनिका 'औषधी वनस्पती' | दर्शनिका (गॅझेटियर) विभाग, महाराष्ट्र शासन. |
| ३. महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा | महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, राज्य दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन |
| ४. संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण | मुख्यवनसंरक्षक, वनसंशोधन वृत्त महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या प्रकाशित पत्रिका. |
| ५. औषधी संग्रह | लेखक कै. वा.ग. देसाई. |
| ६. महाराष्ट्रातील दिव्य वनौषधी | लेखक सदाशिव यशवंत सावंत. |
| ७. वनातील वृक्षवेली | शा.प्र. दिक्षित. |
| ८. आर्यभिषक अर्थात हिदुस्थानचा वैद्यराज (भाग १ ते ८)-१९७३ | कै.आयुर्वेद महामहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे. |
| ९. वनौषधी गुणादर्श (भाग १ ते ७ एकत्र) १९७३ | कै.आयुर्वेद महामहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे. |
| १०. डॉ.अंकुश जाधव | आयुर्वेदाचार्य, मुंबई यांची प्रकाशित 'महाऔषधी' पुस्तके. |
| ११. वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्था (रजि.) पुणे | यांच्या प्रकाशित विविध पत्रिका |
| १२. आदिवासी दवादारू | Compiled by मारूताई डिसूजा, Social Centre अहमदनगर. |
| १३. आयुर्वेदिय महाकोश: अर्थात आयुर्वेदिय शब्दकोश-१९६८ | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. |
| १४. Medicinal Plants of India and Pakistan | By Dostoor J.F. |
| १५. Botany and flora of Maharashtra 1987 | महाराष्ट्र राज्य गॅझेटियर. |
| १६. Flora of Raigad District, Maharashtra State | M.J. Kothari ans S. Moorthy (Flora of India series 3, Botany survey of India) |
| १७. Trees, Shrubs and woody climbers of the Bombay presidency-1902 | By W.A. Talbot. |
| १८. Magic and Medicine of Plants 1989 | The Reader's digest Association Inc. |
| १९. Our Herbal Heritage-2006 | V.K. Mohan,Green Publication |
| २०. Scientific Names of Plants Explained | S.P. Dixit |
| २१. A Hand book of common Remedies in Unani system of medicine | Central council for Reasearch in Unani Medicine, Dept of Ayush, Govt. of India New Delhi. |
| २२. Google Research | Wikipedia - The Free encyclopedia and related websites. |




Scanned by CamScanner